दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक ३५४ | गुरूवार ०८ ऑक्टोबर २०२६
| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com



## इंदुरीकर महाराजांकडून नेतेमंडळींना 'निवृत्ती'चा सल्ला

राजकारणात पुढाऱ्यांना निवृत्ती वयाची अट नसल्याने आता इंदुरीकर महाराजांनी राजकीय पुढाऱ्यांनाही ६० वर्ष वयात निवृत्ती द्यावी असे वक्तव्य केलं आहे. त्यामुळे, समाजमाध्यमातून यावर प्रतिक्रिया उमटत आहेत.राजकारणात येण्यासाठी वयाची १८, २१ आणि २५ वर्षांची अट आहे. मात्र, राजकारणातून निवृत्ती घेण्यासाठी कुठल्याही वयाची अट नाही. त्यामुळे, राजकीय नेते वयाच्या ८०, ९० वर्षांपर्यंत मोठमोठ्या पदांवर असतात, तसेच पक्षाच्या प्रमुख पदावरही विराजमान असतात. मात्र, निवृत्ती महाराज इंदुरीकरांनी आता राजकीय नेत्यांना निवृत्तीचा सल्ला दिला आहे. पुढाऱ्यांनी ६० वर्षानंतर थांबायले हवे, त्यांनी राजीनामाच द्यायला हवा. कारण, वय वाढेल तसे बौद्धीक पातळी कमी होत असते पण पुढारी वय वाढेल तसं वेड्यासारखं करत आहेत, असे म्हणत हभप निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी राजकीय नेत्यांना एकप्रकारे सल्लाच दिला आहे.

# राजधानीत घुमणार मराठी अस्मिता आणि कर्तृत्वाचा आवाज

## राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनानिमित्त दिल्लीत उद्या 'सह्याद्री रत्न' पुरस्कार सोहळा व मराठी मेळावा


यशवंतराव गडाख


डॉ. सुष्मिता विखे पाटील


स्व. साहेबराव घाडगे पाटील


रणजितसिंह देशमुख


मनपा आयुक्त यशवंत डांगे


भाऊसाहेब चौधरी


नित्यानंद येवले


जगद्गुरू महंतअरुणनाथ गिरीजी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** दैनिक राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त 'मराठी मेळावा व सह्याद्री रत्न पुरस्कार सोहळा २०२६' याचे आयोजन शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता होणाऱ्या या दिमाखदार सोहळ्यामुळे राजधानी दिल्लीत महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा आणि मराठी माणसाच्या अस्मितेचा आवाज घुमणार आहे. महाराष्ट्राचे उद्योगमंत्री तथा मराठी भाषा मंत्री उदय सामंत, केंद्रीय आयुष तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आणि भाजपाचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष श्याम जाजू यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.

दुपारच्या सत्रात केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले तसेच देशातील एसआयआर प्रक्रियेच्या प्रमुख आणि प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाच्या अध्यक्षा, माजी न्यायमूर्ती रंजना देसाई यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचीही उपस्थिती अपेक्षित आहे.

या सोहळ्यास दिल्लीतील सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, मराठा मित्र मंडळाचे अध्यक्ष कॅप्टन मोहन काकतिकर, सुदर्शन न्यूजचे संस्थापक सुरेश चव्हाणके, माहिती संचालक हेमराज बागुल, महाराष्ट्र शासनाचे व्यवस्थापक प्रमोद कोळपते यांच्यासह दिल्लीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.दैनिक राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांमध्ये विस्तार करत २२ हजारांहून अधिक दैनिक खपाचा टप्पा गाठला आहे. वेब न्यूज पोर्टल, यूट्यूब आणि सोशल मीडिया माध्यमातून पाच लाखांहून अधिक वाचक व प्रेक्षकांपर्यंत समूह पोहोचला आहे. ग्रामीण आणि (पान ४ वर)

### दिल्लीत मराठी अस्मिता, संस्कृती आणि कर्तृत्वाचा जागर

हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित नसून दिल्लीच्या भूमीवर मराठी अस्मिता, संस्कृती आणि कर्तृत्वाचा जागर घडविणारा महासोहळा ठरणार आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांत सामाजिक, शैक्षणिक, कृषी, औद्योगिक, सहकार, प्रशासन, आरोग्य, क्रीडा, पत्रकारिता आणि आध्यात्मिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांना देशाच्या राजधानीत सन्मान मिळणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री, केंद्रीय सचिव, नवी दिल्लीतील विविध शासकीय विभागांत कार्यरत महाराष्ट्रातील वरिष्ठ अधिकारी व सनदी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. दिल्लीतील मराठी बांधवांचे हक्काचे व्यासपीठ असलेले महाराष्ट्र मंडळ, नवी दिल्ली या उपक्रमात आयोजन समितीसोबत सक्रिय सहभागी आहे.महाराष्ट्राच्या मातीत घडलेल्या कर्तृत्वाला दिल्लीच्या दरबारात सन्मान देणारा आणि देशाच्या राजधानीत मराठी माणसाचा आवाज बुलंद करणारा हा सोहळा ठरेल, या समारंभाला उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्र सह्याद्रीच्या कार्यकारी संपादक पुनम नवले यांनी केले आहे व राष्ट्र सह्याद्री परिवाराने केले आहे.

# एमपीएससी विद्यार्थ्यांना हायकोर्टाचा दणका; रस्त्यावर आंदोलनास मनाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** एमपीएससी परीक्षांमधील विविध प्रश्न आणि मागण्यांसाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने आंदोलनाबाबत लिखित आदेश जारी करताना विद्यार्थ्यांना रस्त्यावर बसून आंदोलन करण्यास मनाई केली आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक पावले उचलली असून, सरकारने मागण्या मान्य केल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आता आंदोलनाचा मार्ग सोडून आपल्या अभ्यासाकडे वळावे आणि आपली स्वप्ने व आकांक्षा पूर्ण करण्यासाठी वर्गात परतावे, असे आवाहन न्यायालयाने केले.

**सरकारने मागण्या मान्य केल्याने आंदोलन मागे घेण्याचे आवाहन**

**वाहतूक कोंडी होणार नाही अशा ठिकाणीच आंदोलनास परवानगी**



न्यायालयाने राज्य सरकारला सार्वजनिक रस्ते खुले राहतील आणि कोणत्याही आंदोलनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पोलिसांनी वाहतूक कोंडी होणार नाही अशा ठिकाणीच आंदोलनास परवानगी द्यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना रस्त्यावर बसून आंदोलन करता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, पुण्यात गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. एमपीएससीच्या कारभारातील विविध प्रश्नांवरून विद्यार्थ्यांमध्ये नाराजी असून, आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. विरोधी पक्षांकडूनही या आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने सकारात्मक कारवाई सुरू केल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे. प्रकरण आता उच्च न्यायालयाच्या विचाराधीन असल्याने विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत पुढील कार्यवाही न्यायालयाच्या निर्देशांच्या चौकटीत होईल. मात्र, सार्वजनिक रस्ते अडवून आंदोलन करण्यास न्यायालयाने स्पष्टपणे प्रतिबंध केला आहे. त्यामुळे पुण्यात सुरू असलेल्या एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची पुढील दिशा काय राहणार, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.

न्यायालयाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे महत्त्व लक्षात घेतले असले तरी सार्वजनिक वाहतूक आणि नागरिकांची गैरसोय होऊ नये, यावर स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी कायदेशीर आणि प्रशासनाने निश्चित केलेल्या मार्गाचा अवलंब करावा, असा संदेश या आदेशातून मिळाला आहे.

# भरदिवसा चाकू हल्ल्यात रवींद्र चव्हाण यांची निर्घृण हत्या

## बालिकाश्रम रोडवरील एशियन फूड मॉलसमोर थरार

- **हल्लेखोर पसार**
- **सीसीटीव्हीच्या आधारे तपासाला वेग**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर शहरातील बालिकाश्रम रोडवरील लेंडकर मळा परिसरात बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास भरदिवसा चाकू हल्ल्यात रवींद्र चव्हाण यांची हत्या करण्यात आली. एशियन फूड मॉलसमोर अज्ञात हल्लेखोरांनी चव्हाण यांना अडवून चाकूने वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना नागरिकांनी तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचार सुरू करण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेने नगर शहरात खळबळ उडाली असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

रवींद्र चव्हाण हे बोल्हेगाव येथील रहिवासी असून राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मंथन चव्हाण यांचे वडील होते. मंथन चव्हाण हे आमदार संग्राम जगताप यांचे कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. त्यामुळे या हत्येमागे राजकीय वाद आहे की पूर्ववैमनस्य, याबाबत सध्या कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालाजी वैद्य यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. फुटेजच्या आधारे संशयितांची ओळख पटविण्याचे काम सुरू असून, त्यादृष्टीने तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली आहेत.

### अचानक हल्ला; काही क्षणांत रक्तरंजित थरार

रवींद्र चव्हाण एशियन फूड मॉलसमोर असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांना अडविले. काही समजण्याच्या आतच त्यांच्यावर चाकूने वार करण्यात आले. हल्ल्यानंतर चव्हाण गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. नागरिकांनी तत्काळ त्यांना जिल्हा रुग्णालयात हलविले; मात्र त्यांचा जीव वाचविता आला नाही.

रवींद्र चव्हाण यांच्या हत्येची माहिती मिळताच राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली. या घटनेमुळे शहरातील राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे. दरम्यान, हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

तोफखाना पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. हल्लेखोर कोण होते, हल्ल्यामागील कारण काय आणि या घटनेचा पूर्ववैमनस्य अथवा अन्य कोणत्या कारणाशी संबंध आहे का, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

शहरातील वर्दळीच्या परिसरात भरदिवसा झालेल्या या हत्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. न्यू आर्ट्स कॉलेजच्या प्रवेशद्वाराजवळील परिसरात घडलेल्या या घटनेने शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. आरोपींचा तातडीने शोध घेऊन घटनेमागील सत्य समोर आणण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# अतिक्रमण हटविताना नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर दगडफेक

## जामखेडमध्ये तिघांविरुद्ध गुन्हा; कर्मचाऱ्यांना मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाच्या आदेशानुसार आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड शहरात सुरू असलेल्या अतिक्रमणविरोधी मोहिमेदरम्यान नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर दगडफेक करून मारहाण केल्याची घटना घडली. बीड रोडवरील अष्टेकर स्नेक्स हॉटेलजवळ अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू असताना हा प्रकार घडला. याप्रकरणी विजय अष्टेकर, त्यांची पत्नी आणि दत्तात्रय अष्टेकर (सर्व रा. बीड रोड, जामखेड) यांच्याविरुद्ध जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगरपरिषद कर्मचारी संभाजी अजिनाथ डोके (वय ३०, रा. भुतवडा, ता. जामखेड) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार, ६ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेनऊ वाजता बीड रोडवरील शासकीय दूध डेअरीपासून अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू करण्यात आली होती. दुपारी साडेएकच्या सुमारास अतिक्रमणविरोधी पथक अष्टेकर स्नेक्स हॉटेलजवळ पोहोचले.

पथकाकडून अतिक्रमण हटविण्याचे काम सुरू असताना विजय अष्टेकर व त्यांच्या पत्नीने स्लॅबवरून नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या दिशेने दगडफेक केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या दगडफेकीत संभाजी डोके यांच्या पाठीवर व उजव्या मांडीवर दगड लागून ते जखमी झाले. तसेच ब्रेकर चालक तुषार अशोक शेळके यांच्या हातालाही दगड लागला. दरम्यान, दगडफेकीनंतर दत्तात्रय अष्टेकर याने शिवीगाळ करत संभाजी डोके यांची गचांडी (पान ४ वर)

# उपनिरीक्षकाची डोक्यात गोळी झाडून आत्महत्या

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पुणे :** पुणे पोलिस दलातील पोलीस उपनिरीक्षक निलेश भाऊसाहेब पाटील यांनी औंध परिसरातील राहत्या घरी स्वतःवर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेमुळे पुणे पोलिस दलात एकच खळबळ उडाली आहे. पाटील हे विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात कर्तव्यावर होते.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटील यांनी डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

दरम्यान, त्यांनी आत्महत्या कोणत्या कारणास्तव केली आहे याबाबत अजून तपशील कळू शकलेला नाही. त्यांना काही मानसिक त्रास होता की अन्य काही व्यक्तिगत कारणातून त्यांनी टोकाचा निर्णय घेतला याबाबत अजून माहिती समोर आलेली नाही. मात्र एका अधिकाऱ्यानेच अशा पद्धतीने स्वतःचं आयुष्य संपवल्याने पुणे पोलीस दलामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

# जलजीवनच्या कामांत ठेकेदारांची मनमानी

## कंत्राट एकाचे, काम दुसऱ्याचे; संमती कशी दिली? विखे पाटलांचा संतप्त सवाल; चौकशीचे आदेश

### ग्रामसेवकही चौकशीच्या फेऱ्यात!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** जलजीवन मिशनच्या कामांमध्ये ठेकेदारांकडून मनमानी सुरू असल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कंत्राट घेऊन कामे न करणाऱ्या ठेकेदारांसह ती कामे दुसऱ्या ठेकेदारांकडे सोपविण्यास संमती देणाऱ्या ग्रामसेवकांची चौकशी करण्याचे आदेश दिले. कंत्राट एका ठेकेदाराने घेतले आणि प्रत्यक्ष काम दुसऱ्याने केले, तर त्याला ग्रामसेवकांनी संमती कशी दिली? असा संतप्त सवाल त्यांनी केला.

पारनेर तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत पाणी, चारा आणि वीज समस्यांचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी विविध गावांतील ग्रामस्थांनी




जलजीवन मिशनच्या कामांसह टंचाईच्या प्रश्नांबाबत तक्रारींचा पाढा वाचला. या तक्रारींची गंभीर दखल घेत संबंधित विभागांनी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

दुष्काळी परिस्थितीत गावांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करताना नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे, यासाठी पाण्याचा उद्भव असलेल्या ठिकाणी फिल्टर बसविण्याचा राज्यातील पहिला प्रयोग अहिल्यानगर जिल्ह्यात होत असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

**■ जलजीवन मिशन ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना असून शासनाने त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र काही ठिकाणी ही योजना ठेकेदारांची झाल्याची खंत विखे पाटील यांनी व्यक्त केली. ग्रामस्थांना विश्वासात न घेता मनमानी पद्धतीने पाइपलाइन टाकणे, निकृष्ट अथवा अपूर्ण कामे करणे आणि शासनाचा निधी खर्च होऊनही अपेक्षित परिणाम न मिळणे, याची चौकशी करण्याचे आदेश त्यांनी दिले.**

चारा टंचाईबाबत पशुसंवर्धन विभागाने नव्याने माहिती संकलित करावी. चारा उत्पादन करणारे शेतकरी, पशुधन असलेले मात्र चारा उपलब्ध नसलेले शेतकरी यांची स्वतंत्र माहिती घेऊन त्यानुसार नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच वीज समस्यांबाबत महावितरणने विशेष बैठक घेऊन नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करावे, असे निर्देश देण्यात आले.

छोट्या समस्यांमुळे गावपातळीवरचा रोष अधिकाऱ्यांवर येतो आणि विनाकारण सरकारची बदनामी होते. त्यामुळे समस्या प्रलंबित ठेवू नका, असे विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना सुनावले.

टंचाईच्या उपाययोजनांसाठी निधीचे प्रस्ताव तातडीने पाठवावेत, निधीअभावी कामे थांबवू नयेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. कुकडी कालव्याच्या कामासाठी ४४९ कोटी रुपये उपलब्ध करून दिले असून, चार उपसा सिंचन योजनांचे सर्वेक्षण सुरू आहे. पुणेवाडी, राळेगणसह अन्य योजनांचे आराखडे तयार झाले असून पारनेर दुष्काळमुक्त करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस आमदार काशिनाथ दाते, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेंद्र हिंगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, पदाधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते.

# मोदीपर्वाची पंचविशी : परिवर्तनाच्या राजकारणाचा प्रवास

राजकारणाच्या पटावर अनेक नेते येतात, निवडणुका जिंकतात, सरकारे स्थापन करतात आणि सत्तेचा कारभार चालवतात. मात्र काही नेतृत्व अशी असतात की, त्यांच्या दीर्घ सार्वजनिक प्रवासामुळे केवळ सत्तेची समीकरणे बदलत नाहीत, तर देशाच्या विकासाकडे पाहण्याची दृष्टीही बदलते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील पंचवीस वर्षांचा प्रवास हा अशाच परिवर्तनाचा अभ्यास करण्याजोगा अध्याय आहे. ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारणाऱ्या नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. गुजरातपासून दिल्लीपर्यंतचा हा प्रवास भारतीय राजकारणातील एका प्रदीर्घ पर्वाची नोंद करणारा आहे.

मोदी यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात सत्तेच्या केंद्रातून झालेली नाही. संघटनात्मक कार्य, समाजाशी संपर्क, जनआंदोलनांचा अनुभव आणि भारतीय जनता पक्षातील दीर्घकाळाचे संघटनात्मक काम या प्रक्रियेतून त्यांचे नेतृत्व घडले. १९७४ मधील गुजरातमधील विद्यार्थी आंदोलन आणि आणीबाणीच्या काळातील भूमिगत जनजागरणाचा अनुभव त्यांच्या राजकीय जडणघडणीतील महत्त्वाचा टप्पा ठरला. संघटनात्मक राजकारणातून प्रशासनाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचलेले नेतृत्व म्हणून मोदींच्या प्रवासाकडे पाहावे लागते.

२००१ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्यासमोर पहिली मोठी प्रशासकीय परीक्षा होती ती भूकंपानंतरच्या पुनर्वसनाची. त्या काळातील प्रशासनात उद्दिष्ट, वेळमर्यादा, आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिणाम यांना केंद्रस्थानी ठेवण्याची कार्यपद्धती पुढे त्यांच्या प्रशासनशैलीची ओळख बनली. गुजरातच्या विकासाच्या मॉडेलवर समर्थन आणि टीका, दोन्ही प्रकारच्या भूमिका मांडल्या गेल्या; मात्र औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील तंत्रज्ञानाचा वापर यामुळे गुजरातच्या विकासाची चर्चा राष्ट्रीय पातळीवर पोहोचली.

२६ मे २०१४ रोजी नरेंद्र मोदी यांनी भारताच्या पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली आणि गुजरातच्या प्रयोगांना राष्ट्रीय पातळीवरील व्यापक विकासाच्या अजेंड्याशी जोडण्याचा प्रयत्न सुरू झाला. जनधन योजना, मुद्रा, स्टार्टअप, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत, उज्ज्वला, घरकुल, जलजीवन मिशन, पायाभूत सुविधांचा विस्तार आणि डिजिटल पेमेंटच्या क्षेत्रातील यूपीआय यांसारख्या उपक्रमांनी शासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संबंध अधिक तंत्रज्ञानाधारित केले.




मोदी यांच्या नेतृत्वाच्या पंचवीस वर्षांच्या प्रवासाचे मूल्यमापन करताना केवळ योजनांची यादी पुरेशी ठरणार नाही. या काळात [illegible] लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले पा[illegible] हा दृष्टिकोन अधिक ठळ[illegible] झाला. बँक खाते, थेट लाभ[illegible] हस्तांतरण, घर, शौचालय, [illegible] नळाचे पाणी, गॅस कनेक्शन [illegible] अशा मूलभूत सुविधांच्या [illegible] माध्यमातून वंचित घटकांपर्यंत [illegible] शासन पोहोचविण्याचा प्रयत्न [illegible] झाला. त्याचवेळी डिजिटल [illegible] अर्थव्यवस्था आणि [illegible] यूपीआयने दैनंदिन व्यवहाराची पद्धत मोठ्या प्रमाणात बदलल[illegible] आत्मनिर्भर भारत हा मोदी सरकारच्या दुसऱ्या महत्त्वाच्या विचारांपैकी एक ठरला. संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती, अंतराळ क्षेत्र आणि उत्पादन क्षेत्रात देशांतर्गत क्षमता वाढविण्यावर भर देण्यात आला. संरक्षण क्षेत्रातील निर्यातीत झालेली वाढ, देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन आणि पायाभूत सुविधांमध्ये झालेली मोठी गुंतवणूक ही या दिशेतील काही ठळक उदाहरणे आहेत. त्याचबरोबर कलम ३७०, तीन तलाक आणि राम मंदिरासारखे दीर्घकाळ राजकीय चर्चे[त] असलेले विषयही मोदी सरकारच्या काळात निर्णायक टप्प्यावर पोहोचले. या निर्णयांचे राजकीय, सामाजिक आणि घटनात्मक मूल्यमापन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून होत राहील; परंतु भारतीय राजकारणाच्या अजेंड्यावर त्यांचा प्रभाव नाकारता येत नाही.

या पंचवीस वर्षांच्या प्रवासात महाराष्ट्राचे स्थान विशेष महत्त्वाचे आहे. उद्योग, शेती, सहकार, शिक्षण, विज्ञान, संस्कृती आणि सामाजिक सुधारणांची समृद्ध परंपरा असलेल्या महाराष्ट्रासाठी मोठ्या पायाभूत प्रकल्पांना केंद्र सरकारच्या धोरणांचा आधार मिळाला. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, समृद्धी महामार्गाशी संबंधित पायाभूत [illegible]ढवण बंदर, नवी मुंबई विमानतळ, [illegible]कल्प, महामार्ग आणि रेल्वे प्रकल्प [illegible]ा विविध क्षेत्रांमध्ये केंद्र आणि राज्य [illegible]रकारच्या समन्वयातून मोठी कामे पुढे आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींशी संबंधित लंडनमधील स्मारक, इंदू मिल स्मारकाचा प्रश्न, छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांचा जागतिक वारसा [य]ादीतील समावेश अशा सांस्कृतिक [illegible]े ऐतिहासिक बाबींनाही या काळात [illegible] मिळाले. महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने पुढे नेण्याची चर्चा सुरू झाली असून विकसित भारताच्या संकल्पनेत महाराष्ट्राने अग्रणी भूमिका बजावावी, ही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मोदी यांच्या कारकीर्दीचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांची राजकीय संवादशैली आणि जनसंपर्काची पद्धत. 'मन की बात'पासून सोशल मीडिया, डिजिटल संवाद आणि थेट जनतेशी संपर्काच्या विविध माध्यमांपर्यंत त्यांनी पारंपरिक राजकीय संवादाला नवे स्वरूप दिले. समर्थकांसाठी हे प्रभावी जनसंपर्काचे माध्यम आहे; तर विरोधक या शैलीकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. लोकशाहीत ही मतभिन्नता स्वाभाविक आहे. मात्र मोदी यांनी भारतीय राजकारणातील नेतृत्व, प्रचार आणि जनसंवादाच्या पद्धतीवर कायमस्वरूपी प्रभाव टाकला आहे, हे नोंदवावे लागेल.

पंचवीस वर्षांच्या या प्रवासाचे पुढील लक्ष्य 'विकसित भारत २०४७' हे आहे. भारताला विकसित अर्थव्यवस्था बनविण्याबरोबरच तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, सामाजिक समावेशकता, महिला सक्षमीकरण, आत्मनिर्भरता आणि सांस्कृतिक वारसा यांचा समन्वय साधण्याचे आव्हान मोदी सरकारसमोर आहे. मोठी स्वप्ने मांडणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या स्वप्नांची अंमलबजावणी आणि त्याचे परिणाम सामान्य नागरिकाच्या जीवनात दिसणे महत्त्वाचे ठरणार आहे.

नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाची पंचवीस वर्षे पूर्ण होत असताना त्यांच्या कारकीर्दीकडे केवळ समर्थक किंवा विरोधक या दोन चौकटींतून पाहण्याऐवजी भारतीय लोकशाही, प्रशासन, अर्थव्यवस्था आणि समाजजीवनावर झालेला व्यापक परिणाम या निकषांवर पाहण्याची गरज आहे. या प्रवासात उपलब्धी आहेत, मोठी आव्हाने आहेत, मतभेद आहेत आणि भविष्यासाठी अपेक्षाही आहेत. गुजरातच्या मुख्यमंत्रिपदापासून देशाच्या पंतप्रधानपदापर्यंतचा हा पंचवीस वर्षांचा प्रवास भारतीय राजकारणातील एका महत्त्वपूर्ण पर्वाची नोंद आहे. पुढील काळात 'विकसित भारत'चे स्वप्न प्रत्यक्षात आणताना मोदी नेतृत्वाची खरी कसोटी लागणार आहे. पंचवीस वर्षांचा अनुभव, जनादेश आणि धोरणात्मक सातत्य यांच्या बळावर भारताला पुढील टप्प्यावर नेण्याचे आव्हान आता अधिक मोठे आहे.

## कोल्हार भगवती मंदिरात ११ ऑक्टोबरपासून नवरात्र उत्सव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार, वार्ताहर :** तुळजापूरची भवानी माता, माहूरची रेणुका माता, कोल्हापूरची महालक्ष्मी आणि वणीची सप्तशृंगी या साडेतीन शक्तिपीठांच्या एकत्रित दर्शनाचा लाभ देणाऱ्या कोल्हार येथील भगवती माता मंदिरात रविवार, ११ ऑक्टोबरपासून नवरात्र उत्सवाला प्रारंभ होत आहे. उत्सव काळात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

नवरात्र काळात मंदिरात दररोज होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन दर्शन व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी यंदाही गाभारा दर्शन बंद ठेवण्याचा निर्णय कोल्हार भगवतीपूर देवालय ट्रस्टचे विश्वस्त व ग्रामस्थ यांच्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे स्थानिक तसेच परगावाहून येणाऱ्या भाविकांना गाभाऱ्याबाहेरून भगवती मातेचे दर्शन घेता येणार आहे.

उत्सवात भक्तिमय वातावरणाला प्राधान्य देत डीजेच्या दणदणाटासह लेझर शोला बंदी घालण्यात आली आहे. मंदिर परिसर व गावात स्वच्छता राखण्यासाठी कोल्हार येथे १२००, तर भगवतीपूर येथे ८०० ओला व सुका कचरा स्वतंत्र ठेवण्यासाठी कचरापेट्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

नवरात्र उत्सवात देवीचे सप्तशती पाठ, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. बाल कीर्तनकार ज्ञानेश्वरी राऊत, शालिनी देशमुख, इंदोरीकर, अरुणनाथगिरी महाराज तसेच कन्हेरकर महाराज यांच्या कीर्तनांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे भक्ती, संस्कृती आणि स्वच्छतेचा संगम उत्सवात पाहायला मिळणार आहे.

उत्सवाच्या नियोजनासाठी झालेल्या बैठकीस ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी रघुनाथ खर्डे पाटील, उपाध्यक्ष साहेबराव दळे, खजिनदार डॉ. भास्करराव खर्डे, विजय निबे, संपत कापसे, विजय डेंगळे, पंढरीनाथ खर्डे, सुजित राऊत, ॲड. उदय खर्डे, संभाजी राजे देवकर, रावसाहेब कमळाजी खर्डे पाटील, बी.के. खर्डे, सुनील शिंदे, प्रवीण बेंद्रे, भगवतीपूरचे उपसरपंच प्रकाश खर्डे यांच्यासह ट्रस्टचे विश्वस्त व ग्रामस्थ उपस्थित होते.



## अल्ताफ शेख यांची फौजदारपदी बढती झाल्याने सत्कार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील पोलीस हेड कॉन्स्टेबल आल्ताफ शेख यांची फौजदार पदी निवड झाल्यामुळे त्यांचा सत्कार समारंभ १९८७-८८ च्या वर्गमित्रांनी साजरा केला. व गेट टुगेदरचा आनंद घेतला.या कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे आयोजन प्रा. विजय बोर्ड यांनी केले.

यावेळी त्यांचे सर्व वर्गमित्र किशोर शिंदे, दामोदर शिंदे, राजू साठे, राजेंद्र देवळात्यकर, सुलतान शेख, दिलीप शिंदे, राजू आहेर, दिलीप लोखंडे , अशोक गोरे, अशोक रणनवरे, अशोक बनकर दौलत पिसाळ, संजय धिरडे, संजय पवार, संजय गुजर, अशोक पवार, अशोक कांगणे, बाळासाहेब आहेर, आबासाहेब बोडखे, संजय तुवर, तान्हाजी घोगरे, कचरू बनसोडे, गोरख मोटकर, बाळासाहेब शिरसाठ, संजय कांबळे, रवि जाधव, शिवाजी कोकणे, कारभारी चांडे, नाना माने, नितिन दहे, बाळासाहेब डिके हे सर्व मित्रपरिवार उपस्थित होते.

## रा.स.पा.चे. संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांची नानासाहेब जुंधारे यांना सांत्वन पर भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील मांजरी येथे राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष, मा. कॅबिनेट मंत्री महादेव जानकर यांनी रासपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य नानासाहेब जुंधारे यांचे वडील पंढरीनाथ जुंधारे यांचे नुकतेच निधन झाले. या दुःखद प्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी जुंधारे परिवाराची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

यावेळी जानकर साहेबांनी पंढरीनाथ जुंधारे यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आणि जुंधारे परिवाराला या कठीण प्रसंगातून सावरण्यासाठी ईश्वर शक्ती देवो अशी प्रार्थना केली.

यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष- शेवते ,मुख्य महासचिव- सलगर युवक प्रदेशाध्यक्ष- अजित पाटील, प्रदेश उपाध्यक्ष- डॉ प्रल्हाद पाटील, प्रदेश सचिव- सय्यदबाबा शेख, तसेच राज्याचे व जिल्ह्याचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



## पंचगंगा कारखान्याचे शेतकऱ्यांना खुले आव्हान..

### 'बाहेर काटा करा, पावती घ्या अन् आमच्याकडे पुन्हा वजन करा

**सुधीर चव्हाण | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** शेतकऱ्याने वर्षभर काळया मातीत घाम गाळून पिकवलेल्या उसाच्या वजनाबाबत कोणतीही शंका राहू नये, यासाठी पंचगंगा कारखान्याने शेतकऱ्यांना बाहेरील काट्यावर ऊसाचे वजन करून पावती घेऊन येण्याची खुली मुभा दिल्याचा दावा केला आहे. 'उसाचा कुठेही काटा करून पावती घेऊन या आणि आमच्याकडे पुन्हा उसाचा काटा करा; तफावत आढळणार नाही अशी भूमिका प्रभाकरकाका शिंदे यांनी मांडली आहे.



ऊस उत्पादक शेतकरी सध्या अनेक अडचणींचा सामना करत आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे उसाच्या वाढीवर परिणाम झाला असून, उत्पादन खर्च वाढला आहे. अशा परिस्थितीत आपल्या उसाच्या वजनाबाबतही शेतकऱ्यांच्या मनात संशय निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे. त्यामुळे वजन प्रक्रियेत पारदर्शकता असणे आणि शेतकऱ्याला त्याची खात्री करून घेण्याची संधी मिळणे महत्त्वाचे ठरते. शेतकरी हा केवळ ऊस पिकवत नाही, तर त्याच्या कष्टातून आपल्या कुटुंबाचे भविष्य घडवत असतो. त्यामुळे त्याच्या उसाच्या प्रत्येक किलो वजनाला योग्य मोबदला मिळणे हा त्याच्या मेहनतीचा आणि हक्काचा प्रश्न आहे.

पंचगंगा कारखान्याने शेतकऱ्यांना बाहेरील काट्यावर वजन करून पावती आणण्याची मुभा दिल्याने वजन प्रक्रियेबाबत थेट पडताळणीची संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले जात आहे. 'प्रश्न विचारण्याचा अधिकार आणि सत्य तपासण्याची मुभा' हीच पारदर्शक कारभाराची खरी कसोटी असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

गेल्या काही काळात पंचगंगा कारखान्याने साखर क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला असून, स्वच्छ कारभार, पारदर्शक व्यवहार आणि शेतकरीहित या मुद्द्यांवर भर दिला जात असल्याचे कारखाना व्यवस्थापनाकडून सांगितले जाते.दरम्यान पंचगंगा कारखान्याने घेतलेल्या या भूमिकेच्या पार्श्वभूमीवर इतर साखर कारखानेही ऊस वजन प्रक्रियेत अशाच प्रकारे पारदर्शकता आणि शेतकऱ्यांना पडताळणीची संधी देणार का? याकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## जि. प. प्राथ. शाळा वेळापूर येथे विद्यार्थ्यांना

### सेवा सहयोग संस्था तर्फे स्कूल किटचे वाटप



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनेवाडी :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला गती मिळावी व त्यांना शैक्षणिक साहित्याची मदत व्हावी, या उद्देशाने 'सेवा सहयोग संस्था, पुणे' यांच्या माध्यमातून निःस्वार्थ आणि उदात्त हेतूने श्री. सारंग दिनकरराव वाबळे यांच्या विशेष सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर येथील विद्यार्थ्यांना मोफत 'स्कूल किट' (शालेय साहित्य व दप्तर) वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व गरजू विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शालेय साहित्य मिळाले आहे. नवीन शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी डिजिटल युगात मागे राहू नयेत आणि त्यांना संगणकाचे आधुनिक शिक्षण मिळावे, या उदात्त उद्देशाने 'सेवा सहयोग संस्था, पुणे' यांच्या मार्फत श्री. सारंग वाबळे यांच्या विशेष सहकार्याने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर येथे संगणक लॅब (Computer Lab) साकारण्यात आले असून संस्थेच्या माध्यमातून संगणक देण्याचे घोषित केले आहे...

या वेळी आयोजित कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक गरुड, शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक पवार, सदस्य दिनेश आहेर, किरण पवार, सतीष पंडोरे , शरद धोत्रे व मालती पांडव, बाळू वाघ, कविता येवले तसेच सारंग वाबळे, दिनकर वाबळे, कैलास कदम, हेमंत वाबळे, मा. पं समिती सदस्य प्रशांत वाबळे , मा उपसभापती वाल्मिकराव कोळपे , बापू बोरावके उपस्थित होते.

## कापूस उत्पादन वाढीसाठी संशोधनाला शेतकऱ्यांच्या अनुभवाची जोड आवश्यक

**राहुरी, प्रतिनिधी :**

कापूस हे मोठी उत्पादनक्षमता असलेले आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचे पीक आहे. कापूस उत्पादक शेतकरी प्रयोगशील असून त्यांनी अनुभवातून विविध लागवड तंत्रे विकसित केली आहेत. या अनुभवाला विद्यापीठाच्या संशोधनाधारित तंत्रज्ञानाची जोड दिल्यास कापूस उत्पादनात निश्चित वाढ होऊ शकते. कृषी विद्यापीठ शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

जागतिक कापूस दिनानिमित्त सेवा संकल्प अभियान-२०२६ अंतर्गत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, कापूस सुधार प्रकल्प, कृषी विभाग व आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद व शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कृषी संशोधन परिषदेचे माजी उपमहासंचालक डॉ. सुरेश कुमार चौधरी उपस्थित होते. हवामान बदलामुळे पावसात मोठे खंड पडत असून त्याचा खरीप पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत आहे. त्यामुळे पाण्याचा प्रत्येक थेंब साठवून जमिनीत जिरविणे आणि शेतीतील जोखीम कमी करण्यासाठी आंतरपीक पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे डॉ. खर्चे यांनी सांगितले.

डॉ. चौधरी यांनी शेतकऱ्यांनी खतांचा विवेकपूर्ण वापर करून विद्यापीठाच्या संशोधनाचा शेतीत प्रभावी वापर करावा, असे आवाहन केले. यावेळी कापूस सुधार प्रकल्पाच्या २५ एकर क्षेत्रावर ४० वाणांचे पीक प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. ठिबकद्वारे पाणी व खत व्यवस्थापन, तण व कीड व्यवस्थापन, शेंडा खुडणी, वाढ व्यवस्थापन आणि ड्रोन तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

कार्यक्रमात कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. विविध प्रकाशनांचे विमोचन तसेच संतुलित खत व्यवस्थापनावर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी व महिला शेतकरी गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## रोटरी क्लब श्रीरामपूरच्याअध्यक्षपदी सरबजीतसिंग चूग, तर सचिवपदी ब्रिजेश शहा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** रोटरी क्लब श्रीरामपूरच्या अध्यक्षपदी सरबजीतसिंग चूग यांची तर सचिवपदी ब्रिजेश शहा यांची निवड करण्यात आले आहे ही निवड २०२६ ते २०२७ या वर्षाकरिता झाली आहे. नवनिर्वाचित अध्यक्ष सरबजीतसिंग चूग हे शहरातील प्रसिद्ध व्यापारी असून काँग्रेसचे ते पदाधिकारी आहेत त्यांना सामाजिक कार्याची आवड आहे मागील वर्षी ते सचिव म्हणून कार्यरत होते सचिवपदी निवड झालेले ब्रिजेश शहा हे शहरातील प्रसिद्ध व्यापारी असून त्यांना सामाजिक कार्याची आवड आहे.नूतन अध्यक्ष व उपाध्यक्ष ची निवड मावळते अध्यक्ष उद्धव तांबोळी यांनी जाहीर केले निवडीनंतर नूतन अध्यक्ष सरबजीतसिंग चूग म्हणाले रोटरीच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा केली जाईल याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जातील याचबरोबर शहर व ग्रामीण भागातील गरजवंत गरजू रुग्णांना रोटरीच्या माध्यमातून मदत मिळून देऊ मोफत डोळ्यांचे शिबिरे घेऊन मोतीबिंदू असणाऱ्या रुग्णांना चष्मे वाटप केले जातील.





रयत शिक्षण संस्थेचे संचालिका मीनाताई जगधने, रोटरी ट्रस्टचे अध्यक्ष सुरेश पाटील बनकर ,सेक्रेटरी नारायणभाई पटेल , नॉबचे अध्यक्ष एडवोकेट भागचंद चुडीवाल ,रयतचे प्रकाश पाटील निकम आदीसह शहरातील मान्यवरानी निवडीबद्दल अभिनंदन केले आहे.

## दुष्काळात विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारु नका!

### आ. खताळ यांचा शाळा-महाविद्यालयांना इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर:** महाराष्ट्र शासनाने संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर केला असून, त्यामध्ये संगमनेर तालुक्याचाही समावेश आहे. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शाळा-महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यां कडून परीक्षा शुल्क आकारू नये, असे शासनाने निर्देश दिले आहेत. मात्र, माजी आमदार बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या सह्याद्री संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जात असल्यामुळे विद्यार्थी वर्गातून नाराजी निर्माण झाली आहे. या प्रकाराच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांना आंदोलन करण्याची वेळ येणे ही बाब दुर्दैवी असल्याचे सांगत दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांवर कारवाई केली जाईल असा इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला आहे

**तक्रार असल्यास प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्या**

दुष्काळी परिस्थितीत शाळा-महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे परीक्षा शुल्क आकारले जात असल्यास त्याबाबतची तक्रार माझ्याकडे किवा प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. शासनाने परीक्षा शुल्क माफीबाबत दिलेल्या निर्देशांची संबंधित शैक्षणिक संस्थांकडून योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे की नाही, याची प्रशासनाने तपासणी करावी. तसेच विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार नाही, यासाठी शाळा-महाविद्यालयांवर लक्ष ठेवावे, अशा सूचनाही आमदार अमोल खताळ यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत शासनाने शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी संबंधित शैक्षणिक संस्थांकडून होणे अपेक्षित आहे. मात्र, शासनाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जात असल्यास त्याचा आर्थिक भार विद्यार्थ्यांवर पडणार आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार खताळ यांनी संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांनी शासनाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, असे स्पष्ट केले आहे. कोणत्याही शाळा किंवा महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारल्याचे आढळून आल्यास संबंधित संस्थेविरोधात नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## शुभ किर्ती ग्रुपच्या वतीने देवी भागवत कथेचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** सालाबाद प्रमाणे सतीश काका तनपुरे यांच्या शुभ कीर्ती ग्रुप च वतीनेआई जगदंबेच्या असीम कृपाशीर्वादाने राहुरीत पिंपळाचा मळा येथे नवरात्री उत्सव कमेटी व पिंपळाचा मळा धार्मिक उत्सव मंडळ यांच्या वतीने आयोजितश्री देवी भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून या कथेचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा तसेच आवाहन शुभ कीर्ती ग्रुप च्या वतीने करण्यात आले आहे





या पावन आणि मंगलमय धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमात देवीच्या महिमेचे श्रवण, भक्तीचा अनुभव आणि आध्यात्मिक ज्ञानाची अमृतधारा अनुभवण्यासाठी आपण आपल्या परिवारासह आवर्जून उपस्थित राहावे.

रविवार दिनांक ११ ऑक्टोबर ते सोमवार १९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत या कालावधीत सायंकाळी ८.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत वैष्णोदेवी मंदिर, पिंपळाचा मळा, राहुरी या ठिकाणी संपन्न होणार असून दररोज कार्यक्रम संपल्यानंतर भाविक भक्तांसाठी फराळाच्या प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविक भक्तांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री देवी भागवत कथेचा श्रवणाचा लाभ घ्यावा व आई जगदंबेच्या चरणी भक्तिभावाने सेवा अर्पण करावी, ही नम्र विनंती. आपली उपस्थिती हीच या भक्तिमय सोहळ्याची खरी शोभा असणार आहे.

या कार्यक्रमाचेआयोजक सतिषकाका साहेबराव तनपुरे हे असून मंडळाची कार्यकारणी अध्यक्ष विशाल विजय तनपुरे,खजिनदार , भगवान बाळासाहेब तनपुरे,प्रसिद्धी प्रमुख अविनाश संजय तनपुरे,उपाध्यक्ष, गौरव विलास कटारे, सचिव संकेत बाळासाहेब घावटे,प्रसिद्धी प्रमुख , सत्यम रंगनाथ तनपुरे यांच्या व शुभकीर्ती ग्रुप व पिंपळाचा मळा धार्मिक उत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यावतीने भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## डावखर कन्या विद्यालयात आरोग्याचा जागर

**श्रीरामपूर** : येथील शंकरराव सतोबा डावखर कन्या विद्यालयात विद्यार्थिनींच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात आणि यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिरात प्रसिद्ध वैद्यकीय अधिकारी डॉ. मुकुंद शिंदे, डॉ. कल्पना जऱ्हाड, डॉ. विशाल शिंगाडे तसेच आरोग्य सेविका मालती खरात यांच्या पथकाने विद्यार्थिनींची आस्तेवाईकपणे तपासणी केली. यात उंची, वजन, रक्तगट, डोळ्यांची तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणीचा समावेश होता. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुवर्णमाला बोधक यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. तपासणीसोबतच विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मौलिक मार्गदर्शनही करण्यात आले. आरोग्याची निगा राखण्याचे महत्त्व यावेळी विशद करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## कोपरगावात १२ व १३ ऑक्टोबरला राज्यस्तरीय दांडिया महोत्सव

**कोपरगाव** : सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मीडियम स्कूलतर्फे सलग चौथ्या वर्षी राज्यस्तरीय शालेय व खुली दांडिया स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १२ व १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६ वाजता शाळेच्या प्रांगणात ही स्पर्धा रंगणार आहे. १२ ऑक्टोबरला शालेय गटाची स्पर्धा होणार असून प्रथम क्रमांकास ७ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकास ५ हजार, तृतीय क्रमांकास ३ हजार रुपये व चषक, तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. १३ ऑक्टोबरला खुल्या गटाची स्पर्धा होणार असून प्रथम क्रमांकास ३१ हजार, द्वितीय क्रमांकास २१ हजार, तृतीय क्रमांकास ११ हजार रुपये व चषक देण्यात येणार आहे. मालेगाव, मनमाड, अहिल्यानगर, श्रीरामपूर, जळगाव, नाशिकसह विविध शहरांतील दांडिया पथके सहभागी होणार आहेत. प्रत्येक संघात किमान १२ स्पर्धक असणे आवश्यक असून सादरीकरणासाठी ८ ते १० मिनिटांचा वेळ दिला जाणार आहे. प्रवेशाची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर असून नावनोंदणी अनिवार्य आहे.

## संगमनेर महाविद्यालयात उद्या विद्यापीठस्तरीय युवा जल्लोष

**संगमनेर** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व संगमनेर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी संगमनेर महाविद्यालयात विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'जल्लोष २०२६'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे.विद्यापीठाच्या पुणे शहर, पुणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड, अहिल्या नगर आणि नाशिक या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमधून सुमारे १५०० विद्यार्थी कलाकार या युवा महोत्सवात सहभागी होणार असून, २८ कला प्रकारांतून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविणार आहेत. या महोत्सवात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. संगीत, नृत्य, ललित कला, थिएटर आणि साहित्यिक अशा पाच प्रमुख कला विभागांतील २८ स्पर्धांमध्ये जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेले विद्यार्थी कलाकार विद्यापीठस्तरीय युवाजल्लोष २०२६' मध्ये आपली कला सादर करणार आहे.

# संगमनेरमधील प्रलंबित पाणीपुरवठा योजना नोव्हेंबरमध्ये पूर्ण करा : मंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

### ठेकेदारांच्या हितासाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यात निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता प्रलंबित पाणीपुरवठा योजनांची कामे वेगाने पूर्ण करून नोव्हेंबरअखेरपर्यंत ती कार्यान्वित करण्याचे निर्देश राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. आमदार अमोल खताळ यांच्या पुढाकाराने मुंबईत झालेल्या बैठकीत संगमनेर तालुक्यातील विविध पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



निमोण, सुकेवाडी, खांजापूर, चंदनापुरी, झोळे, हिवरगाव पावसा, वरवंडी, कासारा दुमाला, मांडवे यांसह तालुक्यातील विविध गावांतील पाणीटंचाई आणि प्रलंबित योजनांबाबत बैठकीत चर्चा झाली. आमदार खताळ यांनी प्रलंबित कामे, निधीची आवश्यकता, वीजबिलांची थकबाकी आणि अपूर्ण कामांचा मुद्दा उपस्थित केला. केवळ कागदोपत्री कामे न करता नागरिकांना प्रत्यक्ष पाणी मिळणे महत्त्वाचे असून, योजनांची कामे कोणत्याही परिस्थितीत लांबवू नयेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. काही ठिकाणी विशिष्ट ठेकेदारांच्या हितासाठी अधिकारी काम करत असल्याच्या तक्रारींचाही बैठकीत मुद्दा उपस्थित करण्यात आला. शासकीय यंत्रणेने ठेकेदारांपेक्षा जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावे, अशी मागणी आमदार खताळ यांनी केली. त्याची दखल घेत मंत्री पाटील यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे उपअभियंता थिटे यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे आदेश प्रधान सचिवांना दिले.

तालुक्यातील काही पाणीपुरवठा योजनांतील अपूर्ण कामे तसेच अतिरिक्त निधीच्या अंदाजपत्रकांचे राज्यस्तरीय यंत्रणेमार्फत त्रयस्थ लेखापरीक्षण करण्याचा निर्णयही घेण्यात आला. तपासात दोषी आढळणाऱ्या ठेकेदारांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. थकीत वीजबिलांमुळे पाणीपुरवठा योजना बंद पडू नयेत, यासाठी आगामी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री पाटील यांनी सांगितले. राजापूर भागातील योजनेतून नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासह जल जीवन मिशनमधून वंचित राहिलेल्या वाड्या-वस्त्यांचा योजनांमध्ये समावेश करण्याची मागणीही खताळ यांनी केली. त्यानुसार सुधारित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.

तालुक्यातील प्रत्येक गाव आणि वाडी-वस्तीपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. बैठकीस प्रधान सचिव पराग जैन, मुख्य अभियंता प्रशांत भामरे, मुख्य कार्यकारी अधिकारी देशपांडे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## ग्रामविकास अधिकारी ज्ञानदेव शिंदे यांच्याकडून एक लाखांची देणगी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी श्रद्धा आणि सेवाभाव अर्पण करत नेवासा तालुक्यातील सुरेगाव गंगा येथील माऊली भक्त ग्रामविकास अधिकारी ज्ञानदेव भगवान शिंदे यांनी संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात बसविण्यात आलेल्या ऑटो प्लांटसाठी देणगी देत सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला. श्री ज्ञानेश्वर जयंतीचे औचित्य साधून मंदिरात येणाऱ्या भाविकांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने सुमारे एक लाख रुपये खर्चून ऑटो प्लांट बसविण्यात आला होता. मंदिरातील या उपक्रमाची माहिती मिळाल्यानंतर ज्ञानदेव शिंदे यांनी माऊली चरणी सेवा म्हणून या संपूर्ण प्लांटचा खर्च आपणच करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार त्यांनी एक लाख रुपयांचा धनादेश महंत देविदास महाराज म्हस्के शास्ट्रेनयांच्याकडे सुपूर्त केला. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे, भिकाजी जंगले, रामभाऊ जगताप, संतसेवेकरी आदिनाथ महाराज पांगरे, शिवाजी होन, विजय कावरे दामोदर पवार यांच्यासह मंदिरातील पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. ज्ञानदेव शिंदे हे नेवासा तालुका ग्रामसेवक संघाचे अध्यक्ष तसेच छत्रपती शिवाजी राजे ग्रामसेवक सहकारी पतसंस्था, अहिल्यानगरचे संचालक असून नेवासा कॉलेज परिसरातील बिरोबा नवरात्र उत्सव मंडळाचे अध्यक्ष म्हणून ही ते कार्यरत आहेत. यावेळी गुरुवर्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी ज्ञानदेव शिंदे यांच्या सेवाभावी वृत्तीचे मनापासून कौतुक केले.

## गुरुची आज्ञा मानून सेवा केल्यास दैदिप्यमान यश मिळते : आप्पासाहेब शेळके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : अध्यात्म हा काटेरी मार्ग आहे कोण काय करते त्यापेक्षा मला काय चांगलं करता येईल ही भावना व श्रद्धा ठेवून गुरुची सेवा करावी गुरुचे आज्ञा म्हणून सेवा केल्यास जीवनात दैदीप्यमान यश मिळते असे प्रतिपादन आडगाव येथील स्वामी सेवेकरी व लोणी येथील फार्मसी कॉलेजचे प्रा. अप्पासाहेब शेळके यांनी केले. प्रवारानगर येथील हनुमान मंदिरात संपन्न झालेल्या साप्ताहिक सत्संग कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.



यावेळी प्रवारानगर येथील स्वामी समर्थ केंद्रातील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ते म्हणाले की जेव्हा समर्पण भावनेने व श्रद्धेने आपण स्वामी सेवा करतो त्यावेळेस निश्चितच गुरुकृपा होते. व गुरुकृपेने जीवनातील अनेक अडथळे दूर होऊन चांगला मार्ग मिळतो याबाबत त्यांनी अनेक दाखले यावेळी दिले. यावेळी उपस्थित स्वामी सेवेकरांच्या हस्ते स्वामी समर्थ महाराजांची महाआरती संपन्न झाली तसेच प्रसाद वाटप करण्यात आले. यावेळी पत्रकार प्रमोद कुंभकर्ण स्वामी सेवेकरी सुवर्णा विजय गांगड सौ राऊत ताई सौ पवार ताई यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## दुष्काळी परिस्थितीत एन.बी. शाखेला समान न्याय द्या : अनिल औताडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरजगाव** : भंडारदरा धरणाचे खरीप आवर्तन सुरू होऊन सुमारे वीस दिवस झाले असतानाही एन.बी. शाखेवरील शेतकऱ्यांना अद्याप पाणी मिळाले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. कालवा बंद करण्याच्या सूचना झाल्याची माहिती मिळाल्यानंतर एन.बी. शाखेवरील १४ गावांतील शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांच्या नेतृत्वाखाली वडाळा पाटबंधारे उपविभागीय कार्यालयात ठिय्या आंदोलन केले.

सकाळी दहा ते दुपारी दोन वाजेपर्यंत झालेल्या आंदोलनात शेतकऱ्यांनी उपकार्यकारी अभियंता संजय कलापुरे यांना निवेदन देऊन एन.बी. शाखेवरील सिंचन पूर्ण होईपर्यंत कालवे बंद करू नयेत, अशी मागणी केली. कार्यकारी अभियंता स्वप्नील काळे यांनी आंदोलनस्थळी येऊन सर्व शेतकऱ्यांचे सिंचन पूर्ण केल्याशिवाय धरणाचे आवर्तन बंद केले जाणार नाही, असे आश्वासन दिले. तसेच जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून एन.बी. शाखेवरील शेतकऱ्यांना पाणी देण्याच्या सूचना करण्यात आल्या.

अनिल औताडे यांनी, दुष्काळी परिस्थितीत नमुना क्रमांक सातच्या अर्जानुसार पाणी वाटपात समान न्याय मिळावा. एन.बी. शाखेवरील शेतकऱ्यांवर सातत्याने अन्याय का? असा सवाल उपस्थित केला. भंडारदरा व निळवंडे धरणांत पुरेसा पाणीसाठा असताना एन.बी. शाखेला पाणी न मिळणे अन्यायकारक असल्याचे त्यांनी सांगितले.

आंदोलनात आमदार हेमंत ओगले, नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व परिसरातील शेकडो शेतकरी सहभागी झाले. एन.बी. शाखेवरील शेतीसह ग्रामपंचायतींच्या तलावांनाही पाणी द्यावे, अशी मागणी करण्यात आली. मागणी मान्य न झाल्यास चाऱ्या बंद होताच पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

# संगमनेर महाविद्यालयात शुक्रवारी विद्यापीठ स्तरीय युवा जल्लोष

### युवक महोत्सवात १५०० विद्यार्थी कलाकार, २८ कला प्रकार; सहभागी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ व संगमनेर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर रोजी संगमनेर महाविद्यालयात विद्यापीठ स्तरीय आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सव 'जल्लोष २०२६'चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या पुणे शहर, पुणे ग्रामीण, पिंपरी-चिंचवड, अहिल्या नगर आणि नाशिक या कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयांमधून सुमारे १५०० विद्यार्थी कलाकार या युवा महोत्सवात सहभागी होणार असून, २८ कला प्रकारांतून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविणार आहेत.

या महोत्सवात कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि फार्मसी महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. संगीत, नृत्य, ललित कला, थिएटर आणि साहित्यिक अशा पाच प्रमुख कला विभागांतील २८ स्पर्धांमध्ये जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेले विद्यार्थी कलाकार विद्यापीठस्तरीय युवाजल्लोष २०२६' मध्ये आपली कला सादर करणार आहे

#### युवा कला महोत्सव उद्घाटनासाठी कुलगुरू येणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, संस्थेचे पदाधिकारी, विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच विद्यार्थी विकास विभागाच्या संचालक डॉ. सविता कुलकर्णी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये विजेते ठरलेल्या सर्व विद्यार्थी कलाकारांनी 'जल्लोष २०२६'मध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड सांस्कृतिक मंडळाचे समन्वयक डॉ. सुरेश गुडदे, डॉ. बाळासाहेब पालवे, डॉ. राजेश्वरी ओझा, डॉ. उमेश जगदाळे , डॉ . अशोक लिंबेकर,विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. प्रताप फलफले, कुलसचिव संतोष फापाळे , विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. दीपक गपले, श्री बाबासाहेब घोटेकर यांच्यासह महाविद्यालयातील उपप्राचार्य,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दत्तक घेतले २८ क्षयरुग्ण

### पोहेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचा स्तुत्य उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव** : केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत पोहेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात ५ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानांतर्गत आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या वर्षीच्या २८ क्षयरुग्णांना (टी.बी. रुग्ण) दत्तक घेतले असून, त्यांना कोरड्या शिध्याचे (न्यूट्रिशन किट) वाटप करण्यात आले.



या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाबद्दल तालुका आरोग्य अधिकारी मा. डॉ. विकास घोलप यांनी पोहेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन केले व कौतुक केले. यावेळी बोलताना डॉ. विकास घोलप यांनी समाजातील दानशूर व्यक्ती, व्यावसायिक आणि संस्थांना पुढे येण्याचे आवाहन केले. ते म्हणाले, टीबी मुक्त भारत अभियानामध्ये प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे. समाजातल्या दानशूर व्यक्तींनी 'निक्षय मित्र' (छळ-ज्ञीहरू चळींीर) म्हणून नोंदणी करून क्षयरुग्णांना न्यूट्रिशन किट आणि कोरडा शिधा देऊन मदतीचा हात द्यावा, जेणेकरून रुग्णांना पौष्टिक आहार मिळून ते लवकर तंदुरुस्त होतील.

या कार्यक्रमाला पोहेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, परिचारिका आणि कर्मचारी उपस्थित होते. वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या या तत्परतेमुळे आणि सामाजिक जाणीवेमुळे परिसरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# नवरात्र उत्सव काळात धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

### यावर्षी देखील गाभारा दर्शन बंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : तुळजापूरची भवानी माता माहूरची रेणुका माता कोल्हापूरची महालक्ष्मी अर्थात कोल्हार ची भगवती माता व वणीची सप्तशृंगी माता अशा साडेतीन शक्तीपीठाचे एकत्रित दर्शनाचा लाभ देणाऱ्या भगवती माता अशा साडेतीन शक्तीपीठाच्या एकत्रित दर्शनाचा लाभ एका ठिकाणी मिळत असलेल्या भगवती मातेच्या मंदिरात नवरात्र उत्सवास रविवार दिनांक ११ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. नवरात्र उत्सव काळात विविध धार्मिक कार्यक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून नवरात्र उत्सव काळात दररोज भाविकांची होणारी गर्दीच्या पार्श्वभूमीवर भाविक भक्तांना दर्शन सुलभ व्हावे यासाठी यावर्षी देखील गाभारा दर्शन बंद ठेवण्यात येणार असल्याचा निर्णय कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्टचे विश्वस्त व ग्रामस्थ यांच्या संयुक्तिक बैठकीमध्ये घेण्यात आला त्यामुळे स्थानिक भाविका बरोबरच परगावाहून येणाऱ्या भाविकांना देखील गाभाऱ्या बाहेरून भगवती माते च्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.



भगवती मातेच्या नवरात्र उत्सवात भक्तीचा जागर होत असतानाच डीजे चा दणदणाट व लेझर शो ला देखील बंदी करण्यात आली आहे कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्टच्या वतीने वतीने कोल्हार साठी १२०० तर भगवतीपुर साठी ८०० सुका कचरा व ओला कचरा

वेगळा ठेवण्यासाठी डस्टबिन चे वाटप करण्यात येणार आहे. नवरात्र उत्सव काळात मंदिरात देवीचे सप्तशती पाठ तसेच कीर्तनाचे कार्यक्रम होणार आहे कोल्हार येथील बाल कीर्तनकार ज्ञानेश्वरी राऊत शालिनी देशमुख इंदोरीकर अरुण नाथगिरी महाराज तसेच कन्हेरकर महाराज यांचे कीर्तनाचे कार्यक्रम संपन्न होणार आहे यामुळे भक्ती परंपरा आणि स्वच्छतेच्या त्रिवेणी संगम या नवरात्र उत्सव काळात दिसणार आहे. नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्ट व ग्रामस्थांच्या संयुक्तिक बैठकीला यावेळी कोल्हार भगवतीपुर देवाला ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी रघुनाथ खर्डे पाटील उपाध्यक्ष साहेबराव दळे खजिनदार डॉक्टर भास्करराव खर्डे विजय निबे , विजय डेंगळे पंढरीनाथ खर्डे सुजित राऊत ॲडव्होकेट उदय खर्डे संभाजी राजे देवकर रावसाहेब कमळाजी खर्डे पाटील बी.के. खर्डे सुनील शिंदे देवालय ट्रस्टचे प्रवीण बेंद्रे भगवतीपुर चे उपसरपंच प्रकाश खर्डे तसेच कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्टचे सर्व विश्वस्त व कोल्हार भगवतीपूरचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### अतिक्रमण हटविताना नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर दगडफेक

धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली आणि त्यांना खाली पाडल्याचे फिर्यादीत नमूद आहे. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करून डोके यांची आरोपीच्या तावडीतून सुटका केली. तसेच अतिक्रमण हटविल्यास तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

घटनेनंतर जखमी नगरपरिषद कर्मचाऱ्यांवर जामखेड ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले. नगरपरिषदेच्या अधिकृत कारवाईत अडथळा आणणे, कर्मचाऱ्यांना मारहाण करणे, दगडफेक करणे आणि धमकी देणे, या आरोपांवरून पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास जामखेड पोलिस करीत आहेत.

### राजधानीत घुमणार मराठी अस्मिता आणि कर्तृत्वाचा आवाज

शहरी महाराष्ट्राच्या प्रश्नांना व्यासपीठ देतानाच, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या मराठी माणसाच्या कर्तृत्वाची दखल घेणे ही राष्ट्र सह्याद्रीची भूमिका राहिली आहे. याच भूमिकेतून यंदाच्या वर्धापन दिनानिमित्त दिल्लीच्या भूमीवर 'मराठी मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कर्तृत्व देशाच्या राजधानीत पोहोचविणे आणि मराठी माणसाच्या योगदानाला राष्ट्रीय व्यासपीठ मिळवून देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

२१ कर्तृत्ववानांचा 'सह्याद्री रत्न'ने सन्मान या ऐतिहासिक सोहळ्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २१ मान्यवरांना विविध 'सह्याद्री रत्न' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे. माजी खासदार व मुळा उद्योग समूहाचे संस्थापक यशवंतराव गडाख यांना 'सह्याद्री रत्न', प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांना 'सह्याद्री शिक्षणरत्न', महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष वासुदेव दिगंबर काळे यांना 'सह्याद्री सहकाररत्न', युवा उद्योजक नित्यानंद येवले यांना 'सह्याद्री उद्योगरत्न', तसेच आदर्श सरपंच प्रदीप चव्हाण यांना 'सह्याद्री ग्रामरत्न' पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. उद्योजक व समाजसेवक भाऊसाहेब चौधरी यांना 'सह्याद्री सेवारत्न', राजहंस दूधचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांना 'सह्याद्री कृषीउद्योग रत्न', अहिल्यानगर महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना 'सह्याद्री प्रशासन रत्न', प्रसिद्ध त्वचारोग तज्ज्ञ व उद्योजक डॉ. दिव्या चंदना यांना 'सह्याद्री आरोग्यरत्न' आणि स्व. साहेबराव घाडगे पाटील यांना मरणोत्तर 'सह्याद्री शिक्षणरत्न' प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय वृंदावन डेव्हलपर्सचे संस्थापक रणजीत बनकर, हिंदवी इंटरप्राइजेसचे राहुल जांभळकर, प्रगतिशील शेतकरी राहुल अमृत रसाळ, ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर, उद्योजक भाऊसाहेब टावरे, सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अरुण लोंगाणी, पॅरालिंपिक असोसिएशनच्या संस्थापक अध्यक्षा पारुल सिंग, उद्योजक राम राहुल चिंबळकर, अमोल विठ्ठल बेंगडे, द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते आणि श्री अडबंगनाथ देवस्थानचे मठाधिपती जगद्गुरु महंत अरुणनाथगिरीजी महाराज यांचाही विविध 'सह्याद्री रत्न' पुरस्कारांनी गौरव होणार आहे.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर घरपट्टी-पाणीपट्टी वसुलीला स्थगिती द्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महाराष्ट्र शासनाने दुष्काळ जाहीर केलेल्या पार्श्वभूमीवर देवळाली प्रवरा शहरातील नागरिकांना घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीतून तात्पुरता दिलासा द्यावा, तसेच विविध आवश्यक दाखले देताना 'नील दाखला' अथवा कर थकबाकी नसल्याचा दाखला सादर करण्याची सक्ती करू नये, अशी मागणी नगरसेवकांसह काँग्रेस नेते व नागरिकांनी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित कदम व मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील यांच्याकडे केली आहे. दुष्काळी परिस्थितीचा शेती, व्यवसाय आणि रोजगारावर परिणाम झाला असून नागरिकांवर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर करांच्या वसुलीचा अतिरिक्त भार नागरिकांवर टाकू नये, अशी भूमिका निवेदनात मांडण्यात आली आहे. दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेऊन घरपट्टी व पाणीपट्टी वसुलीस ठराविक कालावधीसाठी तात्पुरती स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच जन्म दाखला, मृत्यू दाखला, रहिवासी दाखला, मालमत्तेशी संबंधित दाखले यांसह इतर आवश्यक दाखले देताना घरपट्टी किंवा पाणीपट्टी भरल्याचा नील दाखला मागू नये, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर नगरसेवक दासुभाऊ पठारे,सुनीता थोरात, शरद वाळुंज, काँग्रेस नेते वैभव गिरमे, अनिल चव्हाण, सुनील विश्वासराव, दीपक पठारे, अमोल चव्हाण, भाऊसाहेब गुंजाळ, रमेश गायगाये, विजय कुमावत, ॲड. कुमार भिंगारे, किशोर पंडित, केतन चव्हाण, विशाल गाडे, मनीष देठे, कैलास होले, श्रीकांत नालकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## रणजीतसिंह देशमुख यांची जिल्हा बँकेवर संचालकपदी बिनविरोध निवड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर** - आशिया खंडात अग्रगण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी राजहंस दूध संघाचे माजी चेअरमन रणजितसिंह देशमुख यांची संगमनेर तालुका सोसायटी मतदार संघातून बिनविरोध निवड झाली आहे.

काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेने कायम शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठी मदत केली आहे जिल्ह्यातील सर्व सेवा सोसायटी सभासद शेतकरी यांचा लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वावर मोठा विश्वास राहिल्याने या बँकेचा आलेख कायम उंचावत राहिला.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी अनेक वर्षे बँकेचे नेतृत्व केले. त्यांच्या पाठोपाठ लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी या बँकेला नेतृत्व दिले.

यावर्षी राज्यात दुष्काळी परिस्थिती असल्याने ही बँक शेतकऱ्यांची आहे म्हणून बिनविरोध निवडणूक व्हावी याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील सर्व पक्षीय नेत्यांची संगमनेर कारखाना कार्यस्थळावरील अमृत कुटी येथे बैठक झाली. आणि त्यानंतर बिनविरोध निवडणुकीचे वारे वाहू लागले.

संगमनेर तालुक्यातून सोसायटी मतदारसंघातून राजहंस दूध संघाचे चेअरमन व सहकारातील जाण असलेले युवा नेतृत्व रणजितसिंह देशमुख यांना उमेदवारी देण्याचा निर्णय नेतृत्वाने घेतला याचबरोबर रणजितसिंह देशमुख यांनी या निर्णयाचा आदर करून तालुक्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणाऱ्या राजहंस दूध संघाच्या चेअरमन पदाचा राजीनामा दिला.

रणजीतसिंह देशमुख यांनी दूध संघाच्या माध्यमातून दूध उत्पादन वाढीबरोबरच एमडीएफ गोठे, मुरघास संकल्पना अत्यंत प्रभावीपणे राबवली आणि नुकतीच मिशन ५० लिटर हे राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य दूध महासंघाचे चेअरमनपद ही त्यांनी यापूर्वी भूषवले आहे. कोरोना संकट काळात केलेली राज्यातील दूध उत्पादकांना मदत लक्षवेधी ठरली होती. दूध संघाच्या माध्यमातून सहकार आणि ग्रामीण विकास यामध्ये त्यांनी मोठे काम केले असून त्यांच्या या कामाचा फायदा नक्कीच जिल्हा बँकेत होणार आहे.

सेवा सोसायटी मतदारसंघातून ते बिनविरोध निवडून आले आहेत त्याचबरोबर भटक्या विमुक्त जाती जमाती मतदार संघातून संगमनेर तालुक्यातून गणपतराव सांगळे यांना उमेदवारी दिली आहे.

रणजितसिंह देशमुख यांच्या बिनविरोध निवडीबद्दल काँग्रेस पक्षाचे नेते मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, मा आमदार डॉ सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, सौ दुर्गाताई तांबे,युवा नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात, डॉ. मैथिलीताई तांबे,बाजीराव पाटील खेमनर, पांडुरंग पाटील घुले,ॲड माधवराव कानवडे, सुधाकर जोशी ,शंकरराव खेमनर, इंद्रजीत भाऊ थोरात, लक्ष्मणराव कुटे, संपतराव डोंगरे ,हौशीराम सोनवणे, रामहरी कातोरे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे सौ अर्चनाताई बालोडे, दूध संघाचे व्हा चेअरमन राजेंद्र चकोर, व सर्व संचालक मंडळ व विविध पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्यांच्या विकासासाठी काम--रणजीत सिंह देशमुख**

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्त व तत्वांवर संगमनेरच्या सहकाराची वैभवशाली वाटचाल राहिली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संघाचे चेअरमन पद सांभाळताना दूध उत्पादकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करण्याचे काम केले. जिल्हा बँकेत संचालकपदी काम करण्याची संधी मिळाली आहे .या माध्यमातून तालुक्यातील व जिल्ह्यातील शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना जास्तीत जास्त मदत करण्याबरोबर त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी काम करू असा विश्वास नवनिर्वाचित संचालक रणजीतसिंह देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

## उक्कलगावात बिबट्याची दहशत; ऊस फडातून थेट मजुरांच्या दिशेने झेप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव** :श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथील लम्हाणबाबा शिवार आणि धनवाट रस्त्यावरील शेतवस्त्यांवर बिबट्याचा वावर पुन्हा वाढला असून, यामुळे नागरिक व शेतकरी वर्गात तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहेत.सोमवारी सायंकाळी उसाच्या फडातून बाहेर आलेल्या बिबट्याने थेट मजुरांच्या दिशेने झेप घेतल्याची थरारक घटना घडली.

येथील थोरात-मोरे वस्तीजवळ सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास काही शेतमजूर महिला शेतात घास खुरपणीचे काम करत होत्या. याच दरम्यान अचानक जवळच असलेल्या दाट उसाच्या फडातून एक बिबट्या बाहेर आला आणि मजुरांच्या दिशेने झेपावला. या अचानक घडलेल्या प्रकारामुळे मजुरांची दाणादाण उडाली. मात्र, मजुरांनी प्रसंगावधान राखत त्वरित आरडाओरडा केला आणि सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. यामुळे सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला, तरी या घटनेने मजुरांचे धाबे दणाणले आहेत.

बिबट्यासाठी अनुकूल ठरतोय परिसर उक्कलगाव व परिसरातील नदीकाठच्या पट्ट्यात मोठ्या प्रमाणावर ऊसाची शेती केली जाते. पाण्याची उपलब्धता आणि दाट उसामुळे हा परिसर बिबट्यासाठी लपण्यासाठी अत्यंत अनुकूल ठरत आहे. या शिवारात वारंवार बिबट्याचे दर्शन होत असून हल्ल्यांच्या घटना वाढल्या आहेत. यामुळे शेतकरी व शेतमजूर कमालीचे भयभीत झाले असून संध्याकाळनंतर शेतात जाणे मुश्कील झाले आहे.

शेतकऱ्यांचे जीव धोक्यात आल्याने परिसरातील ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. वनविभागाने तात्काळ या घटनेची गंभीर दखल घेऊन संबंधित भागात त्वरित पिंजरा लावावा आणि या बिबट्याला जेरबंद करावे, अशी आक्रमक मागणी करण्यात आली आहे. यावेळी प्रकाश थोरात, गणेश मोरे, बाबासाहेब शेरमाळे, संजय चिंधे, पुरुषोत्तम थोरात, ज्ञानेश्वर चिंधे, साईनाथ थोरात, ओम थोरात, कार्तिक चिंधे व कृष्णा शेरमाळे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी ही मागणी केली असून, तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

**रानवस्त्यांवर 'रात्रीच्या वेळी' वीजपुरवठा सुरू ठेवा!**

गेल्या महिन्यापासून गावठाण परिसरात सायंकाळी सात ते नऊ या वेळेत वीजपुरवठा सुरळीत ठेवला जात असला, तरी शेतवस्तीवरील वीजपुरवठा खंडित राहत असल्याने ग्रामस्थांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. यामुळे अंधारात बिबट्याचे दर्शन वारंवार होत असून नागरिकांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला आहे. आगामी नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर धनवाट रस्त्यावरील शेतवस्तीवर सायंकाळच्या वेळी वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा, अशी आक्रमक मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## ऊसाला पाच हजारांचा दर द्या; अन्यथा प्रतिटन हजार रुपये अनुदान ; अभिजित पोटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा**: सन २०२६-२७च्या ऊस गाळप हंगामापूर्वी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस धोरणात्मक निर्णय घ्यावा, ऊसाला योग्य दर द्यावा आणि वजन काट्यांवरील गैरप्रकारांना आळा घालावा, या मागण्यांसाठी शिवसेनेचे युवा नेते तथा ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी अभिजित अशोकराव पोटे यांनी शासनाकडे निवेदन दिले आहे. मागण्यांवर ७ ऑक्टोबरपर्यंत सकारात्मक निर्णय घेऊन शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत चर्चा न झाल्यास ८ ऑक्टोबरला पुणे येथील साखर आयुक्त कार्यालयावर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

कमी पर्जन्यमानामुळे अनेक भागांत यंदा ऊस पिकाची अपेक्षित वाढ झालेली नाही. अशा परिस्थितीत गाळप हंगाम लवकर सुरू केल्यास साखर उतारा कमी होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे ऊसाला प्रतिटन पाच हजार रुपये दर द्यावा किंवा प्रतिटन एक हजार रुपये अनुदान जाहीर करावे, अशी प्रमुख मागणी पोटे यांनी केली आहे.

साखर कारखान्यांच्या वजन काट्यांवरील गैरप्रकार रोखण्यासाठी आयटी अभियंत्यांचा समावेश असलेले भरारी पथक नियुक्त करावे. ऊसाचे वजन झाल्यानंतर ३० सेकंदांत शेतकऱ्याच्या मोबाईलवर वजनाची माहिती पाठवणे बंधनकारक करावे, अशीही मागणी आहे.

याशिवाय ऊस वाहतूक खर्च प्रत्यक्ष अंतरानुसार निश्चित करावा, साखरेची किमान विक्री किंमत प्रतिकिलो ५५ रुपये करावी आणि उत्पादन खर्चाचा विचार करून ऊस दर निश्चित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. २०२५-२६च्या हंगामातील दुसरा हप्ता प्रतिटन ५२५ रुपये तातडीने द्यावा, अशीही मागणी आहे.

७ ऑक्टोबरपर्यंत बैठक न झाल्यास ८ ऑक्टोबरला महात्मा फुले कृषी विद्यालय चौक ते साखर आयुक्त कार्यालय मोर्चा काढून त्यानंतर बेमुदत ठिय्या आंदोलन केले जाईल, असा इशारा पोटे यांनी दिला.

## आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या पाठपुराव्याला यश

### रामपूरवाडीतील गावठाण फिडरचे रखडलेले काम सुरू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहाता** :

राहाता तालुक्यातील रामपूरवाडी गावासाठी मंजूर असलेल्या ११ केव्ही गावठाण फिडरच्या लिंक लाईनचे गेल्या दोन वर्षांपासून रखडलेले काम अखेर पुन्हा सुरू झाले आहे. गावातील वीजपुरवठ्याची समस्या दूर करण्यासाठी रामपूरवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने २९ जून २०२६ रोजी पत्रव्यवहार करून स्वतंत्र गावठाण फिडरचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्याकडे करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत आ. कोल्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून रखडलेले काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्या.

रामपूरवाडी गावासाठी अंदाजे सहा किलोमीटर लांबीची ११ केव्ही गावठाण फिडर लिंक लाईन मंजूर करण्यात आली आहे. या कामाला २०२४ मध्ये सुरुवात झाली होती. मात्र, विविध अडचणींमुळे गेल्या दोन वर्षांपासून काम रखडले होते. सध्या गावासाठी जुनी ११ केव्ही कृषी वीजवाहिनी कार्यरत असून, लोडशेडिंग आणि ओव्हरलोडमुळे या वाहिनीवर वारंवार फॉल्ट होत असल्याने ग्रामस्थांना वीजपुरवठ्याच्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्वतंत्र गावठाण फिडरचे काम पूर्ण झाल्यानंतर रामपूरवाडीतील सुमारे ५०० घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांना त्याचा लाभ मिळणार आहे. स्वतंत्र फिडरमुळे कृषी वीजवाहिनीवरील भार कमी होऊन गावातील वीजपुरवठा अधिक सुरळीत होण्यास मदत होणार आहे.

फिडरचे काम सुरू असताना रेल्वे क्रॉसिंग तसेच स्थानिक शेतकऱ्यांच्या अडचणी निर्माण झाल्याने मागील दोन दिवसांपासून काम बंद होते. ही बाब आ. विवेकभैय्या कोल्हे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता, संगमनेर तसेच एनसीसीच्या प्रोजेक्ट मॅनेजर यांच्याशी फोनवरून चर्चा केली. संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी पाठवून अडचणी दूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

दिवाळीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत गावठाण फिडरचे काम पूर्ण झाले पाहिजे आणि दिवाळीपर्यंत रामपूरवाडीतील नागरिकांना स्वतंत्र गावठाण वीजपुरवठा मिळाला पाहिजे, अशा स्पष्ट सूचना आ. कोल्हे यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच रेल्वे क्रॉसिंगच्या अडचणीबाबत पुणतांबा येथील रेल्वे अधिकाऱ्यांशी आणि स्थानिक शेतकऱ्यांशी चर्चा करून कामासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. त्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांनीही सहकार्याची भूमिका घेतल्याने बंद असलेले काम पुन्हा सुरू झाले.

गावठाण फिडरचे काम पुन्हा सुरू झाल्याने रामपूरवाडी ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. रखडलेले काम तातडीने सुरू करून दिवाळीपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्याबद्दल सतीश आप्पा जगताप, मच्छिंद्र शिंदे, मच्छिंद्र गोरे, मनोज साळुंखे, विलास आंबडकर, सुभाष सांबारे, आसाराम आग्रे, शिवनाथ गायके, दत्तात्रय सांबारे, अमोल लोंढे, शिवा थोरात, रवींद्र नळे, अजय धनवटे, सतीश गिरे, अविनाश लोंढे, अभिराज शिंदे, विनायक आग्रे, बाळासाहेब धनवटे आदींनी आ. विवेकभैय्या कोल्हे यांचे आभार व्यक्त केले.

या कामासाठी कार्याध्यक्ष बबनराव काळे, उपसरपंच मंदाताई काळे, सोसायटीचे व्हाईस चेअरमन चंद्रभान भोरकडे पाटील, लहानु वडणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रकाशजी शेळके, संजीवनी युवा प्रतिष्ठानचे युवा सेवक प्रसादजी काळे, विनायक धनवटे आदींनीही पाठपुरावा व सहकार्य केले. संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून फिडरच्या कामाला पुन्हा गती मिळाली असून, दिवाळीपूर्वी काम पूर्ण होऊन गावाला स्वतंत्र वीजपुरवठा मिळण्याची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

## निधनवार्ता

### हरिश्चंद्र शिंदे



टाकळीभान : घूमनदेव येथील कै.हरिश्चंद्र गोपीनाथ शिंदे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्च्यात तीन भाऊ, एक बहीण, पत्नी, दोन मुली, एक मुलगा, पुतणे ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. घुमनदेव भजनी मंडळाचे सदस्य रवींद्र शिंदे यांचे ते वडील होत.

### भाऊसाहेब घाडगे



**ताहाराबाद** : राहुरी तालुक्यातील कणगर येथील भाऊसाहेब लक्ष्मण घाडगे (वय-८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, दोन बहिणी,सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. कणगर येथील कामगार पोलीस पाटील बाळासाहेब मुसमाडे यांचे आजोबा तर सामाजिक वनीकरण सेवानिवृत्त अधिकारी व कणकावती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष वसंतराव घाडगे यांचे ते वडील होत.

### सौ. गंगुबाई उगले



**गणोरे** : डोंगरगांव ( ता- अकोले ) सौ.भागुबाई कारभारी उगले यांचे आज बुधवारी सकाळी वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पच्छात पती, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे, पतवंडे असावी मोठा परिवार आहे. डोंगरगावचे माजी उपसरपंच व पत्रकार अशोक उगले, प्रगतीशील शेतकरी सोमनाथ उगले यांच्या त्या मोतीश्री होत्या.

### शांताबाई शिंदे



**सोनई** : नेवासा तालुक्यातील बेल्हेकर वाडी येथील वयोवृद्ध शांताबाई मुरलीधर शिंदे (वय ८४) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा एक मुलगी, सुना, नातू पंतू, पुतणे, असा मोठा परिवार आहे, लेखापरीक्षक आर. एन. शिंदे यांच्या त्या चुलती तरी सतीश शिंदे यांच्या त्या मातोश्री होत.

### ताराबाई विखे



**कोल्हार** : लोणी बुद्रुक तालुका राहता येथील ताराबाई भाऊराव विखे (वय ७९) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, दोन मुले, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.त्या विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन स्व. संपतराव बापूनाना कडू पाटील यांच्या भगिनी होत.

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या चुलती तर लोणी ग्रामपंचायतीचे सदस्य प्रवीण विखे व सचिन विखे यांच्या मातोश्री होत.

### हिराबाई खर्डे



**कोल्हार** : भगवतीपुर येथील हिराबाई चंद्रभान खर्डे (वय ७५ ) यांचे वृद्धापकाळाने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले दोन मुली जावई सुना नातवंडे असा परिवार आहे. कोल्हार भगवतीपुर देवालय ट्रस्टचे माजी विश्वस्त चंद्रभान खर्डे यांच्या त्या पत्नी तर सतीश खर्डे व अनिल खर्डे यांच्या त्या मातोश्री होत.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

गुरुवार दि. ८ ऑक्टोबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

९ — १८० / २७० / १४४ ; ६ — २४० / २६८ / ३३० ; २ — ३४५ / ३३० / ३३६

१९-९५-७६-६५-८२-२०

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

१ — १२८ / १४६ / ११९ ; ७ — १२४ / २७८ / २२३ ; ४ — १३० / ६८० / ७७०

०१-१२-३७-७६-८४-४५

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

६ — २४० / २६८ / ३३० ; ८ — १२५ / २६० / ४४० ; ४ — १३० / २४८ / २२०

३६-६०-५८-८९-१४-४२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६



**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 01/06/2026 to 05/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 12/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 26/06/2026 | 336 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 10/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 17/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 24/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |


## नवीन स्कोडा स्लाविया सर्व काही सांगते शैली, सार्थकता आणि आत्मविश्वासासह

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नाशिक** : स्कोडा ऑटो इंडिया ने नवीन स्लावियासाठी किंमती जाहीर केल्या असून पुढील आठवड्यापासून डिलिव्हरी सुरू होतील. सर्व काही सांगणारी सेडान, नवीन स्लाविया अधिक तीक्ष्ण युरोपियन डिझाइन, आनंददायी कामगिरी, हुशार तंत्रज्ञान, सुधारित आराम आणि सिद्ध सुरक्षितता एकाच आकर्षक पॅकेजमध्ये एकत्र आणते. भारत-विशिष्ट एमक्यूबी-एओ -आयएन प्लॅटफॉर्मवर बांधलेली, ही लॉन्चपासून सहा ट्रिम्समध्ये उपलब्ध आहे – क्लासिक, क्लासिक+, सिग्नेचर, स्पोर्टलाइन, प्रेस्टीज आणि मोंटे कार्लो. १.० टीएसआयसाठी सहा-स्पीड मॅन्युअल किंवा अगदी नवीन आठ-स्पीड टॉर्क कन्व्हर्टर ऑटोमॅटिक, तर १.५ टीएसआयसाठी सात-स्पीड डीएसजी आहे.

स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड डायरेक्टर आशिष गुप्ता म्हणाले, स्लाविया ने नेहमीच सेडानमध्ये ग्राहकांना हव्या असलेल्या गुणांचा समावेश केला आहे – कालातीत डिझाइन, ड्रायव्हिंगचा आनंद, आराम, सुरक्षितता आणि अभियांत्रिकी. नवीन स्लाविया या ताकदींवर अधिक तीक्ष्ण स्टाइलिंग, हुशार तंत्रज्ञान आणि अगदी नवीन आठ-स्पीड ऑटोमॅटिकसह बांधली आहे. हे खरोखर सर्व काही सांगते कारण ते तडजोड न करता संपूर्ण सेडान अनुभव देते – आकांक्षी पण सुलभ, चालवायला आनंददायी पण आरामदायक, आणि नवीन पिढीतील ग्राहकांसाठी संबंधित.

नवीन स्लाविया त्याचे युरोपियन डिझाइन अगदी नवीन एलईडी हेडलॅम्प्स आणि टेललॅम्प्स, क्रमवार मागील टर्न इंडिकेटर्स, आडवा क्रोम ग्रिल स्ट्रिप, सुधारित पुढील आणि मागील स्टाइलिंग आणि नवीन अलॉय व्हील्ससह अधिक तीक्ष्ण करते. मोंटे कार्लोमध्ये अनन्य बॅजिंग, लाल ॲक्सेंट्स आणि काळे बाह्य घटक आहेत. आठ विद्यमान रंगांसोबत, आर्क्टिक सिल्व्हर आणि कॅपुचिनो बेज नव्याने जोडले गेले आहेत तर कॅपुचिनो बेजची डिलिव्हरी डिसेंबर २०२६ मध्ये सुरू होईल.

स्कोडा सुपर केअरमध्ये मानक ४-वर्षे/१,००,००० किलोमीटर वॉरंटी, ४ वर्षे रोडसाइड असिस्टन्स आणि दोन वर्षे/३०,००० किलोमीटरपर्यंत चार मोफत लेबर सर्व्हिसेस समाविष्ट आहेत. वॉरंटी सहा वर्षांपर्यंत वाढवता येते, सोबत सर्व व्हेरियंट्समध्ये सहा-वर्षे गंज आणि तीन-वर्षे पेंट वॉरंटी.

सहा ट्रिम्स – क्लासिक, क्लासिक+, सिग्नेचर, स्पोर्टलाइन, प्रेस्टीज आणि मोंटे कार्लो – ग्राहकांना त्यांच्या पसंतीनुसार सर्वोत्तम स्लाविया निवडू देतात. सुसज्ज क्लासिकपासून वैशिष्ट्यपूर्ण प्रेस्टीज आणि अधिक स्पोर्टी मोंटे कार्लोपर्यंत, प्रत्येक व्हेरियंट डिझाइन, आराम, तंत्रज्ञान, कामगिरी, सुरक्षितता आणि मूल्य यांच्या विचारपूर्वक मिश्रणाद्वारे सर्व काही सांगते हे वचन व्यक्त करतो.

## द • ख • ल

## शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याची गरज: प्राचार्य राजेंद्र वाघ



**निघोज** : शैक्षणिक संस्कृती महत्वाची असून वीस वर्षांपूर्वीचे दिवस आणी आजचे दिवस यामध्ये मोठी तफावत असून शिक्षकांनी हायटेक प्रणाली वापर केल्यास अधिक सक्षमपणे शिकवण्याचे काम होणार असून शैक्षणिक संस्कृतीला पाठबळ देण्याची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे प्रतिपादन देवीभोयरे येथील अंबिका माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र वाघ यांनी व्यक्त केले आहे. वाघ यांना अहिल्यानगर जिल्हा मुख्याध्यापक संघाने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याबद्दल त्यांचा पारनेर तालुका पत्रकार संघ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज, राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष दत्ता उनवने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पारनेर तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष बाबाजी वाघमारे, पत्रकार जयराम सरडे, सुलतान सय्यद, म्हस्के सर ,वैद्य मॅडम ,डगळे सर ,औटी मॅडम ,हासे सर, शिंदे मॅडम, बेलोटे सर आदी तसेच विद्यालयाचे शिक्षक वृंद उपस्थित होते. मुख्याध्यापक ते प्राचार्य या शैक्षणिक प्रवासाची माहिती त्यांनी देताना सांगितले की अंबिका विद्यालय माध्यमातून या पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांना घडवीण्याचे काम सहकारी शिक्षकांनी केले. संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव जाधव व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यालय ते उच्च माध्यमिक विद्यालय जडणघडणीत मोठ्या प्रमाणात योगदान दिले. याची दखल घेत मुख्याध्यापक संघाने पुरस्कार दिला हे सर्व शिक्षक सहकारी व संस्था चालक यांचे खऱ्या अर्थाने योगदान असून आपण फक्त निमित्तमात्र असल्याचे त्यांनी सांगितले.

## कार्यकर्त्यांसाठी नव्हे तर वरिष्ठ पातळीवरच्या कॉलवर त्यांची जिल्हा बँकेतून माघार - सचिन घुले

**कर्जत** : नेत्यांसाठी सर्वसामान्य कार्यकर्ता जीवाचे रान करून मताधिक्य देतो. मात्र त्याच नेत्याला नंतर सत्तेचा गुर्मी चढते. कालच्या जिल्हा बँकेच्या निवडणुकीत देखील राम शिंदेंनी हाच कित्ता गिरवला. वरिष्ठांचा फोन आल्यावरच त्यांनी माघार घेतली. परंतु आपण कार्यकर्त्यांसाठी अंतरत्माचा आवाज ऐकत माघार घेतली असल्याची स्पष्टोक्ती देने हास्यास्पद असल्याची परखड प्रतिक्रिया शिवसेना शिंदे गटाचे सचिन घुले यांनी दिली. पत्रकार परिषदेत घुलेंनी अनेक घटनांचा समाचार घेतला.

विधान परिषदेचे सभापती राम शिंदेंनी सोमवारी जिल्हा बँकेच्या उमेदवारी अर्ज दाखल न करता त्यांनी आपण ही निवडणूक सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी खुली केली आहे. यावेळी बोलताना राम शिंदे यांनी आपली सभापती पदाच्या प्रतिष्ठा आणि संविधानिक पदास अनुसरून अंतरत्माचा आवाज ऐकत या निवडणुकीत उमेदवार अर्ज दाखल न करण्याचा निर्णय जाहीर केला. या वरून बुधवारी कर्जतचे सचिन घुले यांनी पत्रकार परिषद घेत राम शिंदेंवर टीकास्त्र सोडले. त्यांनी वरिष्ठ नेत्यांचा सांगण्यावरून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. मात्र ते स्पष्ट न करता त्यांनी आपण कार्यकर्त्यासाठी उमेदवारी न करणे हे सांगणेच हास्यास्पद आहे. वास्तविक पाहता त्यांच्या अनेक निवडणुकीत सर्वसामान्य कुटुंबातील असंख्य कार्यकर्ते जीवाचे रान करून मताधिक्य देतात. त्याची किंमत त्यांना कधी राहत नाही. सत्तेच्या चढत्या आलेखात त्यांना विसर पडतो. जामखेड नगरपरिषद निवडणुकीत ताकदीने लढा दिला हा दावा देखील घुलेंनी खोडत निवडणूक केवळ एका नेत्याच्या ताकदीवर जिंकली जात नाही. त्यामागे असंख्य कार्यकर्ते, स्थानिक पदाधिकारी आणि नेत्यांची रणनीती असते. जामखेडच्या विजयात राम शिंदेंसह आमदार सुरेश धस यांच्या राजकीय डावपेचांचा महत्त्वाचा वाटा होता. केवळ आपणच त्या विजयाचे शिल्पकार असल्याचे श्रेय घेवू नये. विजय मिळाला की निवडणूक ताकदीने लढवली. आणि पराभव झाला की परिस्थिती,कार्यकर्ते किंवा इतर कारणांकडे बोट दाखवायचे ही राजकीय सोय किती दिवस चालणार ? असा सवाल उपस्थित केला. विधानसभा निवडणुकीतील तुमचा अल्पमतांनी झालेला पराभव आपल्या पेक्षा तुमच्या कार्यकर्त्यांच्या जिव्हारी जास्त लागला होता हे विसरता कामा नये असा सल्ला पत्रकार परिषदेत दिला.

## गणेश पाखरे यांचा गौरव

**तिसगाव प्रतिनिधी** : वन्यजीव आणि पर्यावरणाचे रक्षण करणारे वनसेवक गणेश रामनाथ पाखरे यांचा आनंदवन परिवाराच्यावतीने सन्मान करण्यात आला.वनवा विझवणे, गर्भागिरी डोंगरातील सर्व वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या या सेवेबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या यशाचे सर्व श्रेय आपल्या कुटुंबाला आणि मार्गदर्शकांना दिले.
निसर्गाचे रक्षण करण्यासाठी आणि जंगलांचे संवर्धन करण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या वन कर्मचाऱ्यांचा आनंदवन' परिवाराच्यावतीने मांडवे ता . पाथर्डी येथे गौरव समारंभ आयोजित केला होता. कार्यक्रमाला वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सन्मानित कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी आपले अनुभव कथन केले.वनवा विझवणे, हिंसक बिबट्याला जेरबंद करणे , चिमणी-पाखरे आणि सर्व वन्यप्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या या सेवेबद्दल गणेश पाखरे यांचा गौरव करण्यात आला. आमदार मोनिका ताई राजळे, माजी सरपंच भगवान मरकड , मढी देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठल मरकड ,युवा नेते प्रदीप पाखरे ,वनपरिक्षेत्र अधिकारी शाम शिरसाट , हभप रामनाथ पाखरे , अशोक महाराज मरकड , वनसेवक जहांगीर शेख , वनरक्षक एकनाथ खेडकर , मुस्ताक सय्यद , मनीषा शिरसाट , बबन मंचरे,ऋषिकेश मडके यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे .

# सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी हाच मोठा बचाव

## सायबर सेलचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : इतर गुन्ह्यांपेक्षा सायबर गुन्हे संपूर्णपणे वेगळे आहेत. सायबर फसवणुकीमध्ये सावधगिरी बाळगणे हाच मोठा बचाव असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल सायबर क्राईम ब्रँच पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले.
जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने रेल्वे स्टेशन भागातील संजीवनी कॉलनीत जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित सायबर सुरक्षितता जनजागृती कार्यक्रमात श्री ढिकले यांनी जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले.
श्री ढिकले पुढे म्हणाले की, जगात कोणतीही गोष्ट फुकट आणि स्वस्त मिळत नाही. त्यामुळे सोशल मीडियावरील





जाहिरातींच्या प्रलोभनांना नागरिकांनी बळी पडू नये. सायबर फसवणुकीमध्ये प्रामुख्याने डिजिटल अरेस्ट, डिजिटल मार्केटिंगचे अमिष, मोठ्या परताव्याच्या आमिषाने शेअर मार्केटिंगमध्ये गुंतवणुक हे तीन प्रकार निदर्शनास येतात. यामध्ये फसवणूक झालेल्या नागरिकांपैकी ६०% लोक हे ज्येष्ठ नागरिक आहेत.
त्यामुळे सायबर फसवणुकीपासून बचावासाठी ज्येष्ठ नागरिकांनी विशेष सतर्क रहावे असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी केले.
सायबर गुन्हेगारांकडे विविध मार्गांनी डेटा जमा झालेला असतो. ज्येष्ठ नागरिकांना सहज विश्वासात घेऊन फसवणूक करणे सोपे असते ही बाब सायबर गुन्हेगारांना लक्षात आलेली आहे.
ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करताना सायबर गुन्हेगारांकडून वेगवेगळ्या संकल्पना वापरण्यात येतात. गंभीर गुन्ह्यात सहभाग आढळला आहे अशी भीती घालून डिजिटल अरेस्टचा बनाव केला जातो. त्या माध्यमातून तातडीची स्थिती निर्माण केली जाते. कारवाईची भीती घातली जाते. आणि शेवटी संबंधितांकडून मोठ्या रकमा उकळल्या जातात.
याचबरोबर मोठ्या परताव्याच्या अमिषाने शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक तसेच डिजिटल मार्केटिंगच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात नफ्याची लालूच दाखवली जाते व त्या माध्यमातून देखील जेष्ठ नागरिकांची आर्थिक फसवणूक होत आहे.

**त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी सोशल मीडिया हाताळताना अतिशय सतर्क रहावे.**

सायबर गुन्हेगारांकडून फसवणूक झाल्यास तात्काळ १९३० या क्रमांकावर संपर्क साधून तात्काळ आपली तक्रार नोंदवावी तसेच आपल्या जवळच्या नातेवाईकांना सत्य घटना सांगून तातडीने उपाययोजना करावी असे आवाहन श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थितांना केले.
डिजिटल अरेस्ट असा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. ही फसवणुकीची पूर्णपणे काल्पनिक संकल्पना आहे. अशा प्रकारांना नागरिकांनी अजिबात घाबरू नये व बळी पडू नये.
याचबरोबर आपले पर्सनल डिटेल्स, ओटीपी, संशयास्पद अनोळखी लिंक्स, एपीके फाइल्स इत्यादींबाबत सतर्कता बाळगावी. याचबरोबर सोशल मीडियावरील जाहिरातींच्या प्रलोभनांना बळी पडू नये अशा महत्त्वपूर्ण सूचना श्री ढिकले यांनी यावेळी उपस्थित जेष्ठ नागरिकांना केल्या.
यावेळी रेल्वे स्टेशन परिसर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष के.डी. खानदेशे, सचिव अशोक आगरकर, श्रीकृष्ण लांडगे, जनजागृती कार्यक्रमाचे संयोजक अभय ललवाणी यांच्यासह मोठ्या संख्येने जेष्ठ नागरिक उपस्थित होते. या जनजागृती कार्यक्रमाच्या आयोजनासाठी ऋषिकेश ललवाणी, सुयश चांडक, अश्विन डोंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी-धारवाडी शिवारात बिबट्याचा धुमाकूळ!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिराळ चिचोंडी** : पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी, धारवाडी व परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याने प्रचंड दहशत माजवली आहे. धारवाडी येथील गवळी वस्तीमध्ये जनावरांच्या शेडमध्ये घुसून बिबट्याने एका म्हशीच्या वगाराला (वासराला) जागीच ठार केले, तर झाडावर कुत्र्याचे अर्धवट खाल्लेले अवयव आढळल्याने नागरिक पुरते हादरले आहेत. रात्रीच्या वेळी वीज गायब असणे आणि कमी दाबाच्या विजेमुळे अंधाराचे साम्राज्य पसरल्याने शेतकऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, वन विभागाने तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



**पहाटे ३ वाजता गवळी वस्तीत हल्ला**

मिळालेल्या माहितीनुसार, धारवाडी (ता. पाथर्डी) येथील देविदास गवळी यांच्या जनावरांच्या शेडमध्ये पहाटे ३ च्या सुमारास भक्ष्याच्या शोधात आलेल्या बिबट्याने अचानक हल्ला केला. यात त्यांनी म्हशीचे वगार जागीच फस्त केले. याच परिसरात झाडावर कुत्र्याचे अर्धवट खाल्लेले अवयव दिसून आल्याने बिबट्याने झाडावर बसून कुत्रे आणि कोंबड्यांवर ताव मारल्याचे सरपंच भीमराज सोनवणे यांनी सांगितले.
धारवाडी,गीतेवाडी, डोंगरवाडी, डमाळवाडी लोहसर खांडगाव या डोंगराळ पट्ट्यात बिबट्याने गेल्या अनेक दिवसांपासून ठिय्या मांडला आहे. गेल्या वर्षभरात बिबट्याने अनेक शेळ्या, मेंढ्या व कुत्र्यांचा फडशा पाडला आहे. काही दिवसांपूर्वीच काही वाहनधारकांनी या परिसरातील रस्त्यावर बिबट्याला भ्रमण करताना आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केले होते. लोकवस्तीत बिबट्याचा मुक्त वावर वाढल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.

**अंधाराच्या साम्राज्यामुळे धोक्यात भर: महावितरणविरुद्ध तीव्र संताप**

बिबट्याच्या दहशतीसोबतच परिसरात वीज महामंडळाच्या ढिसाळ कारभारामुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या दीड महिन्यापासून रात्रीची वीज गायब असते, तर चार-पाच दिवसांपासून येणाऱ्या विजेचा प्रकाश अत्यंत कमी (लो-व्होल्टेज) आहे. यामुळे अनेक शेतकऱ्यांचे विजेचे साहित्य व उपकरणे जळून खाक झाली आहेत. रात्रीच्या वेळी बिबट्याचा वावर असताना अंधारात शेतात जाणे शेतकऱ्यांसाठी जीवघेणे ठरत आहे.
या परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी आणि शेतमजूर दहशतीखाली जगतात. रात्रीच्या वेळी शेतातील पिकांना पाणी देणे अथवा जनावरांची राखण करणे कठीण झाले आहे. या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष न करता वन विभागाने तातडीने पिंजरा बसवून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी सरपंच भीमराज सोनवणे, उपसरपंच रामेश्वर काळापहाड,भाऊसाहेब गोरे, राहुल शिरसाठ, राजेश आंधळे यांच्यासह चिचोंडी व धारवाडी परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

**वन विभागाची भूमिका**

''घटनेची माहिती मिळताच वन विभागाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. ज्या ठिकाणी बिबट्याचा वावर आहे, तेथे तात्काळ पिंजरा बसवून शेतकऱ्यांना भयमुक्त करण्याचे काम सुरू आहे. नागरिकांना किंवा शेतकऱ्यांना ज्या ठिकाणी बिबट्याचे दर्शन होईल, त्यांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधावा. माहिती मिळताच त्या भागाचा सर्व्हे करून बिबट्याला जेरबंद करण्यास मदत होईल.''

**- ऋषिकेश मडके (वन विभाग अधिकारी)**

**महावितरणला आंदोलनाचा इशारा**

''गेल्या दीड महिन्यापासून रात्रीची वीज टिकत नाही आणि गेल्या काही दिवसांपासून येणाऱ्या विजेचा दाब इतका कमी आहे की उपकरणे जळत आहेत. नादुरुस्त लाईट सोडून महावितरणला नेमके काय सिद्ध करायचे आहे? बिबट्याचा वाढता वावर पाहता महावितरणने या भागात रात्रीच्या वेळी सिंगल फेज वीज पूर्ववत द्यावी; अन्यथा ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र संघर्ष आणि आंदोलन हाती घ्यावे लागेल.''

**- रामेश्वर काळापहाड (उपसरपंच)**

## दिपक पाटील यांची श्री वृद्धेश्वरच्या तज्ञ संचालकपदी निवड

### कै. सुभाषराव (आप्पा) पाटील यांच्या एकनिष्ठेला राजळे कुटुंबाने दिला न्याय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**खरवंडी कासार** :
खरवंडी कासार विविध कार्यकारी सोसायटीची व्हाईस चेअरमन दिपक अंदुरे पाटील यांची श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाण्याच्या तज्ञ संचालकपदी निवड झाल्याने परिसरातुन आनंद व्यक्त होत आहे खरवंडी कासार चे माजी सरपंच कै. सुभाषराव अंदुरे पाटील यांचे ते चिरजिंव आहेत कै . सुभाषराव अंदुरे हे तालुक्याच्या राजकारणात राजळे समर्थक म्हणून ओळखले जात होते
खरवंडी कासार व कासार समाजाचे भूषण म्हणून परिचित असणारे, कै. सुभाषराव (आप्पा) पाटील हे तालुक्याच्या दृष्टीने अल्प असणाऱ्या कासार समाजातून असतानाही त्यांनी विविध पदे भूषवली पाथर्डी तालुक्याचे माजी आमदार, ज्येष्ठ नेते मा. अप्पासाहेब राजळे यांच्याशी त्यांनी एकनिष्ठता ठेवत कै. आमदार राजीव राजळे, आ. मोनिकाताई राजळे या सर्वांबरोबर एकनिष्ठपणे राहून तालुका स्तरावर राजकारणात ते सक्रिय होते. त्यामुळे कै. सुभाषराव पाटील यांना राजळे घराण्याने खरेदी-विक्री संघ, पाथर्डी बाजार समिती, श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना या सारख्या संस्थांवर प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली.त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे चिरंजीव, उच्चशिक्षित असणारे . श्री. दिपक पाटील यांनी ही राजळे कुटूंबा बरोबर एक निष्ठता ठेवल्या मुळे , दिपक पाटील यांची श्री वृद्धेश्वर कारखान्यावर तज्ञ संचालक म्हणून निवड झाली आहे. दिपक पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून अल्पसंख्य असणाऱ्या कासार समाजाला प्रतिनिधित्व देऊन संधी दिल्याबद्दल राजळे कुटुंबाचे कासर समाज्या च्या वतीने आभार मानले जात आहेत.

## संस्कार भारती अहिल्यानगर समितीच्या वतीने ''संघ शताब्दी - कला महोत्सव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : येथील संस्कार भारती पश्चिम प्रांत, अहिल्यानगर समितीच्या वतीने 'संघ शताब्दी – कला महोत्सव' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून हा महोत्सव शुक्रवार दिनांक ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता माऊली सभागृह, सावेडी रोड, अहिल्यानगर येथे संपन्न होणार आहे. या महोत्सवाचे उद्घाटक म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक मा. श्री. नानासाहेब जाधव यांची सन्माननीय उपस्थिती असणार आहे.
महोत्सव दोन सत्रात होणार असून, प्रथम सत्रात संस्कार भारती अखिल भारतीय कला धरोहर विभाग संयोजक मा. श्री. ओजसजी हिराणी हे मार्गदर्शक म्हणून लाभले असून, ते ''स्थापत्य और भारतीय विमर्श'' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती समितीचे अध्यक्ष ॲड. दीपक शर्मा यांनी दिली.तर द्वितीय सत्रात नृत्य विधेच्या माध्यमातून 'पंच परिवर्तन' या विषयावर आधारित

संस्कार भारती
''सा कला या विमुक्तये''
कला एवं साहित्य की अखिल भारतीय संस्था

कला प्रस्तुती सादर केली जाणार आहे. संस्कार भारती अहिल्यानगर समितीच्या नृत्य विधा प्रमुख कु. आश्लेषा पोतदार आणि नृत्य विधा समन्वयक कु. उत्कर्षा दगडे यांचे मार्गदर्शनात नृत्य प्रस्तुतीचे सादरीकरण होणार आहे, अशी माहिती सचिव सौ. स्नेहल झांबरे यांनी दिली.
कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून, नागरिकांनी नियोजित वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन संस्कार भारती अहिल्यानगर समितीचे सहसचिव सौ. तन्मयी भावे, श्री. नंदकुमार देशपांडे, कोषप्रमुख श्री. मिलिंद ऋषी तसेच समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## ऐसा सभासदांसाठी आयोजित गौरी-गणपती देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात







**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (ऐसा) आणि उमा स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने ऐसा सभासदांसाठी आयोजित करण्यात आलेल्या गौरी-गणपती देखावा स्पर्धेचे बक्षीस वितरण उत्साहात संपन्न झाले. या स्पर्धेत संस्थेच्या ३० सभासदांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे परीक्षण तसेच बक्षीस वितरण इन्स्टिट्यूशन ऑफ इंडियन इंटेरियर डिझाईनचे माजी अध्यक्ष अमोल खोले आणि शुभ फ्लॉवर डेकोरेटर्सचे संचालक सचिन भुतारे यांच्या हस्ते करण्यात आले.
यावेळी मनोगत व्यक्त करताना अमोल खोले म्हणाले की, गौरी-गणपती देखावा स्पर्धेच्या माध्यमातून सभासद तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या कलागुणांना वाव मिळतो. विविध देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सभासदांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. गौरी-गणपती देखावा स्पर्धेच्या माध्यमातून आपला सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा जोपासला जातो, असे त्यांनी सांगितले.
सचिन भुतारे यांनी विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. तसेच अशा प्रकारच्या देखावा स्पर्धेत कोणत्या बाबींकडे लक्ष दिले पाहिजे, याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.
उमा स्टील कंपनीचे रिजनल हेड विजय दगडे म्हणाले की, उमा स्टीलच्या माध्यमातून सलग तिसऱ्या वर्षी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमामुळे शहरातील आर्किटेक्ट व इंजिनीअर्स यांच्या कलागुणांना वाव मिळून त्यांच्या विचारांना चालना मिळते. तसेच हा सण उत्साहात साजरा करण्यास प्रोत्साहन मिळून सामाजिक एकोपा जपण्याचा हेतूही साध्य होत असल्याचे त्यांनी नमूद केले.
संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे म्हणाले की, संस्था दरवर्षी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यातून सामाजिक संदेश देण्याचे काम करते. दरवर्षी या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद वाढत आहे. स्पर्धा पारदर्शक पद्धतीने घेण्यात येते. परीक्षक परीक्षण करताना देखाव्यासाठी टाकाऊ वस्तूंचा केलेला उपयोग, देखाव्यामागील सामाजिक संदेश तसेच स्पर्धकांनी स्वतः घेतलेली मेहनत या बाबींचा विचार करतात, असे त्यांनी सांगितले.
गौरी-गणपती देखावा स्पर्धेत अजय दगडे यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. सुयोग पवार आणि अनिकेत हळगावकर यांना द्वितीय क्रमांकाचे, तर सुरेश परदेशी आणि शिवम गोंधळे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक विभागून देण्यात आले.
याशिवाय सचिन क्षीरसागर, मकरंद देशपांडे, महेश मुळे, किरण टकले आणि विनोद काकडे या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.
स्पर्धेत शिवम चांडवले, वैभव फिरोदिया, दादा बेरड, प्रल्हाद जोशी, महेश तांदळे, रोहित साळुंके आणि सोनु साळुंके यांनीही सहभाग नोंदविला.
गौरी-गणपती देखावा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुनिल औटी, संतोष खांडेकर, अनमोल जैन, सागर ढगे, संकेत पादीर, आदिनाथ आंबेकर, अमेय कुलकर्णी, सुनिल जाधव, गौरव मांडगे आणि विजय उजनीमठ यांनी काम पाहिले.
तसेच समिती सदस्य अभिजित देवी, शैलेश सप्रे, वैशाखी हिरे आणि सुनिल हळगावकर यांनीही स्पर्धेच्या आयोजनासाठी योगदान दिले.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय दगडे यांनी केले, तर संस्थेचे सचिव भूषण पांडव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## बॅडमिंटन स्पर्धेत लक्ष्मीवाडीच्या सोमैया विद्यामंदिर ची दमदार कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने अहिल्यानगर येथील वाडिया पार्क येथे उत्साही वातावरणात पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धेत सोमैया विद्याविहार, मुंबई संचलित सोमैया विद्यामंदिर, लक्ष्मीवाडीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत क्रीडा क्षेत्रात विद्यालयाचा नाव लौकिक उंचावला आहे. या स्पर्धांमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांत घवघवीत यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.
स्पर्धेच्या १४ वर्षांखालील मुलींच्या गटात सोमैया विद्यामंदिरच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत थेट अजिंक्यपद पटकाविले. या विजयी संघात सायली माने, श्रद्धा साबळे, समृद्धी साबळे, आदिती जमधडे आणि रोहिणी कुलकर्णी या होतकरू खेळाडूंचा समावेश होता. याशिवाय, १९ वर्षांखालील मुलांच्या संघानेही जिद्द व चिकाटीचे प्रदर्शन करत उपविजेतपदाचा मान मिळविला. साईश शिंदे, वेदांत कौसे आणि तेजस जेऊघाले यांनी या संघातून उल्लेखनीय खेळ केला. तसेच, १९ वर्षांखालील मुलींच्या संघानेही चमकदार खेळ करत तृतीय क्रमांक पटकावला, ज्यामध्ये सिद्धी साबळे, रिद्धी साबळे आणि श्रुती मोकळ यांनी सहभाग घेतला होता.
विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाची दखल घेत, १४ वर्षांखालील मुलींच्या संपूर्ण विजयी संघाची तसेच १९ वर्षांखालील मुलींच्या गटातून उत्कृष्ट खेळ करणाऱ्या रिद्धी साबळे यांची आगामी पुणे विभागीय शालेय बॅडमिंटन स्पर्धे साठी अहिल्यानगर जिल्ह्याचे अधिकृत प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड करण्यात आली आहे.
विद्यालयाच्या खेळाडूंना मिळालेल्या या यशामागे क्रीडाशिक्षक श्री. संजय अमोलिक, श्रीमती रूपाली टेके आणि श्रीमती शुभांगी राऊत यांचे मोलाचे व सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी गाजवलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदरणीय समीर सोमैया सर, क्रीडा अकादमीचे प्रमुख एझाझ खान सर, आदित्य सिंग सर, स्थानिक शाळा समितीचे सचिव मा. सुहास गोडगे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संजय राऊत, क्रीडा समन्वयक श्री. रोहन शिंदे सर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतरवृंदाने सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून, आगामी पुणे विभागीय स्पर्धेसाठी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

## समर्थच्या खेळाडूंची विविध क्रीडा स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी

### मैदानी स्पर्धा, क्रिकेट, रायफल शूटिंग आणि कुस्तीमध्ये खेळाडूंचे उल्लेखनीय यश; विभागीय स्तरासाठी अनेक खेळाडूंची निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या अंतर्गत आयोजित विविध जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. फुलगाव-पुणे येथील जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा, शिरूर येथील रायफल शूटिंग स्पर्धा आणि लोणी देवकर, ता. इंदापूर येथील कुस्ती स्पर्धा, नारायणगाव येथील मैदानी स्पर्धेत,समर्थच्या खेळाडूंनी पदकांची कमाई केली.
फुलगाव, पुणे येथे पार पडलेल्या १९ वर्षांखालील मुलांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत समर्थ ज्युनिअर कॉलेज, बांगरवाडी-बेल्हे संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर समर्थच्या तीन खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड





झाली आहे.
यामध्ये विघ्नेश पवार, ओम रोकडे आणि चिराग झिंजाड यांचा समावेश आहे.
सीताबाई थिटे कॉलेज ऑफ फार्मसी, शिरूर येथे झालेल्या जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत समर्थ ज्युनिअर कॉलेजची खेळाडू कुमारी इशिता काकडे हिने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला. तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, पुढील स्पर्धेसाठी तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.
लोणी देवकर, ता. इंदापूर, येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत समर्थच्या तीन महिला कुस्तीपटूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. समृद्धी जाधव हिने ६५ किलो वजनी गटात द्वितीय, तन्वी जाधव हिने ७२ किलो वजनी गटात द्वितीय, तर समीक्षा माळी हिने ७६ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक मिळविला. नारायणगाव येथे पार पडलेल्या मैदानी स्पर्धेत समर्थच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध प्रकारांत प्राविण्य मिळविले. तिहेरी उडीमध्ये स्वरा लेंडे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत ईश्वरी घोलप हिने द्वितीय क्रमांक पटकावला.
४÷४०० मीटर रिले स्पर्धेत स्वरा लेंडे, प्रांजल येवले, श्रावणी चौधरी आणि समृद्धी शेळके यांच्या संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच ४०० मीटर हार्डल्समध्ये श्रावणी चौधरी हिने द्वितीय, तर समृद्धी शेळके हिने तृतीय क्रमांक मिळविला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे संबंधित खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.
समर्थच्या विद्यार्थ्यांनी मैदानी क्रीडा, क्रिकेट, रायफल शूटिंग आणि कुस्ती अशा विविध क्रीडा प्रकारांत सातत्यपूर्ण कामगिरी करत संस्थेच्या क्रीडा क्षेत्रातील लौकिकात भर घातली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जि.प. सदस्या स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत, प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर, तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. क्रीडा संचालक एच.पी. नरसुडे क्रीडा शिक्षक सुरेश काकडे,विनायक वऱ्हाडी व अश्विनी जगदाळे यांचे विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन मिळाले.

## दखल

### बैलपोळ्याच्या खरेदीवर पावसाअभावी परिणाम




**कवठे येमाई :** शिरूर तालुक्याच्या पश्चिम भागातील कवठे येमाईसह बेट भागातील गावांमध्ये भाद्रपदातील बैलपोळ्याची तयारी सुरू झाली आहे. बाजारपेठांमध्ये बैलांच्या सजावटीचे साहित्य, रंग, झुली, गोंडे, शिंगांचे रंग तसेच पूजासाहित्याची दुकाने सजली आहेत. मात्र पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, त्याचा परिणाम पोळ्याच्या खरेदीवरही जाणवत आहे. बाजारपेठेत अपेक्षित गर्दी नसल्याने काही ठिकाणी शुकशुकाट दिसून येत आहे.

बैलपोळा हा शेतकरी आणि पशुधनाच्या जिव्हाळ्याचा सण आहे. या दिवशी बैलांची पूजा करून शेतकरी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. त्यामुळे दरवर्षी पोळ्याच्या काळात ग्रामीण बाजारपेठेत मोठी उलाढाल होते. मात्र यंदा पावसाअभावी खरीप पिकांच्या उत्पादनाबाबत चिंता निर्माण झाल्याने सणाच्या खरेदीवरही त्याचा परिणाम होत असल्याचे व्यापारी वर्गातून सांगण्यात येत आहे.

कवठे येमाई बाजारपेठेतील व्यापारी रविकिरण नेवासकर यांनी सांगितले की, पोळ्यासाठी मोठ्या अपेक्षेने दुकानात साहित्य भरले आहे. मात्र ग्राहकांची संख्या आणि खरेदीचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे दिसत नाही. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसेल तर बाजारपेठेतील उलाढालीवर त्याचा परिणाम होणारच, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली.शिरूर तालुक्यातील बेट भाग हा शेतीप्रधान परिसर आहे. मात्र यंदा पावसातील खंडामुळे सोयाबीन, बाजरी, मका, कांदा यांसह अन्य खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. आवश्यक वेळी पाऊस न झाल्यास उत्पादनात घट होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.सणासुदीचे दिवस सुरू असतानाच शेतीवर पावसाचे संकट असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. समाधानकारक पाऊस झाला नाही तर खरीप हंगामासह बाजारपेठेतील खरेदी-विक्रीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांचे लक्ष सणाच्या तयारीपेक्षा पिकांच्या भवितव्याकडे अधिक लागले आहे.

### बाटलीमध्ये पेट्रोल न दिल्याने कामगाराला मारहाण

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर (ता. शिरूर) येथे पेट्रोल पंपावरील कामगाराने बाटलीमध्ये पेट्रोल न दिल्याने कामगाराला मारहाण करण्यात आल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे आकाश बाबू इंगळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.शिक्रापूर (ता.शिरूर) येथील चाकण चौक येथे असलेल्या गुजर पेट्रोल पंपावरील कामगार काम करत असताना एम एच १२ व्हि डब्ल्यू २७२४ हि रिक्षा घेऊन आकाश इंगळे पेट्रोल पंपामध्ये आला, त्यांनी पेट्रोल पंप कामगार पंकज पटेल यांच्याकडे बाटलीमध्ये पेट्रोल मागितले आस्था पंकज याने बाटलीमध्ये पेट्रोल देण्यास नकार दिल्याने आकाश याने पेट्रोल पंपावरील सर्व कामगारांना शिवीगाळ, दम दाटी करत सार्वजनिक ठिकाणी अश्लील हावभाव करुन हाताने तसेच कमरेच्या पट्ट्याने पंकज पटेल याला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली, घडलेल्या प्रकाराबाबत पंकज श्रीराम धारी पटेल (वय ३४ वर्षे रा. यश इन चौक कारेगाव ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी आकाश बाबु इंगळे (रा. करंजेनगर शिक्रापूर ता. शिरूर जि. पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे हे करत आहे.

### विनर्स अकादमी सील; शैक्षणिक हितासाठी पर्यायी व्यवस्थेची मागणी

आळंदी : दिवेआगर येथे सहलीसाठी गेलेल्या आळंदीतील आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर प्रशासनाने विनर्स अकादमीची संबंधित मालमत्ता सील केली आहे. या कारवाईचे पालन करताना अकादमीत शिक्षण घेणाऱ्या अन्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी मागणी नगरसेवक हेमंत ऊर्फ सागर गुलाबराव कुऱ्हाडे यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.दुर्घटनेनंतर प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विनर्स अकादमीची मालमत्ता सील केली. मात्र, क्लासेस बंद झाल्याने अनेक विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणात व्यत्यय निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या अभ्यासक्रम व परीक्षेच्या तयारीवर परिणाम होऊ नये, यासाठी तातडीने पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित शिक्षण विभाग व सक्षम प्राधिकरणांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरक्षित ठिकाणी सुरू ठेवण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी. तसेच पालकांची चिंता आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन निर्णय घ्यावा, असे कुऱ्हाडे यांनी पत्रात नमूद केले आहे.दुर्दैवी घटनेची वेदना विसरता येणार नाही; परंतु त्या वेदनेतून निरपराध विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होऊ नये, हीच प्रशासनाची खरी संवेदनशीलता ठरेल, असे नगरसेवक सागर कुऱ्हाडे यांनी म्हटले आहे.

### शिरूरमध्ये शालेय साहित्य वाटप व पुरस्कार सोहळा

**शिरूर :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या शिरूर तालुका शाखेच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. शिरूर येथील विद्याधाम प्रशालेसमोरील राजभोग बँक्वेट हॉलमध्ये हा कार्यक्रम होणार आहे.सामाजिक उपक्रमाचे हे पत्रकार संघाचे १५ वे वर्ष असून, उद्योगपती प्रकाश धारिवाल यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके अध्यक्षस्थानी राहणार आहेत.कार्यक्रमास ज्येष्ठ सिनेअभिनेते सुनील गोडबोले, शिरूर नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे, माजी आमदार ॲड. अशोक पवार, तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, पंचायत समिती सभापती स्वाती घावटे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे, उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्र भोसले, पुणे जिल्हाध्यक्ष सिताराम लांडगे, शिरूर उपनगराध्यक्ष मितेश गादिया यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# चारा टंचाईपूर्वीच ‘चारा साक्षरता व संवर्धन अभियान’

## पीक अवशेषांचे संकलन, चारा प्रक्रिया व उत्पादनावर भर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यातील काही भागांत पर्जन्यमानातील तूट आणि खरीप पिकांच्या उत्पादनावर झालेला परिणाम लक्षात घेता आगामी काळात हिरवा व वाळलेला चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर टंचाई निर्माण होण्यापूर्वीच उपाययोजना करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने राज्यभरात ‘चारा साक्षरता व संवर्धन अभियान’ राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

**टंचाई निर्माण झाल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा टंचाईपूर्वीच उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करणे अधिक महत्त्वाचे आहे. पशुपालकांनी उपलब्ध चारा सुरक्षित ठेवून पीक अवशेषांवर प्रक्रिया करून सकस चारा निर्मितीला प्राधान्य द्यावे.**
**– डॉ. किरण पाटील, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग**

या अभियानांतर्गत जनजागृतीसोबतच पशुपालकांना प्रत्यक्ष प्रशिक्षण व प्रात्यक्षिके देण्यात येणार आहेत. ज्वारी, बाजरी, मका, गहू, भात, तूर, हरभरा आदी पिकांच्या काढणीनंतर उपलब्ध होणारा कडबा, भुसा, पेंढा व धाटे यांची नासाडी किंवा जाळण्याऐवजी त्यांचे संकलन, सुरक्षित साठवणूक, प्रक्रिया आणि पोषणमूल्यवर्धन करण्यावर भर दिला जाणार आहे.

गावनिहाय पीक अवशेषांची माहिती घेऊन त्यांची योग्य साठवणूक, बुरशी प्रतिबंध, निकृष्ट चाऱ्यावर प्रक्रिया, कडबा व पेंढ्यावर युरिया प्रक्रिया तसेच कडबाकुट्टी यंत्राचा वापर याबाबत प्रात्यक्षिके घेतली जाणार आहेत. हिरवा चारा उपलब्ध असलेल्या भागात मुरघास निर्मितीला चालना देण्यात येणार असून पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये हायड्रोपोनिक युनिट आणि अझोला बेड विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सिंचन सुविधा असलेल्या शेतकऱ्यांना कमी कालावधीत व कमी पाण्यात येणाऱ्या चारा पिकांचे बियाणे उपलब्ध करून देणे, धरणे व तलावातील पाणी ओसरल्यानंतर गाळपेरा क्षेत्रात चारा पेरणीचे नियोजन करणे, तसेच गावागावांत पशुपालक बैठका व मेळावे घेण्याचे नियोजन आहे. माहितीपत्रके, रेडिओ, डिजिटल माध्यमे, व्हॉट्सॲप गट आणि लघुपटांच्या माध्यमातूनही जनजागृती केली जाणार आहे.

अभियानाची गावस्तरावरील अंमलबजावणी व प्रशिक्षणाची जबाबदारी पशुवैद्यकीय अधिकारी आणि सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. तालुका पशुसंवर्धन अधिकारी नियमित आढावा घेतील, तर जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कृती आराखडा तयार करून अंमलबजावणीची पडताळणी करतील. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तसेच पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील तज्ज्ञांचे मार्गदर्शनही घेण्यात येणार आहे. अभियानासाठी विभागाकडील उपलब्ध निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

## कृती समितीच्या दणक्याने सोनवडी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याची दुरुस्ती सुरू !

### ६ ऑक्टोबरच्या रस्ता रोको आंदोलनाचा इशारा ; त्यापूर्वीच प्रशासनाकडून दुरुस्तीला सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत :** भीमा नदीवरील सोनवडी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या जुन्या, गंजलेल्या व खराब झालेल्या लोखंडी प्लेट्समुळे मोठ्या प्रमाणात पाणीगळती होत असल्याचा गंभीर प्रश्न सोनवडी बंधारा बचाव व पाणी हक्क कृती समितीने झोपलेल्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. यामध्ये, दौंड, शिरुर व श्रीगोंदा तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थांच्या पाण्याच्या प्रश्नासाठी कृती समितीने प्रशासनाकडे निवेदन देऊन सोनवडी बंधाऱ्याच्या जुन्या लोखंडी प्लेट्स बदलणे, पाणीगळती रोखणे तसेच बंधाऱ्याची आवश्यक दुरुस्ती तातडीने करण्याची मागणी केली होती. मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कार्यवाही न झाल्यास दि. ६/१०/२०२६ रोजी दौंड – सांगली – मनमाड मार्गावर सोनवडी येथील पवार व्हेज हॉटेलसमोर रस्ता रोको आंदोलन



करण्यात येईल असा स्पष्ट इशारा कृती समितीच्या वतीने प्रशासनाला निवेदनाद्वारे देण्यात आला होता. या आंदोलनाच्या इशाऱ्याची तसेच शेतकरी व ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत ५ ऑक्टोबर रोजी सोनवडी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. आंदोलनाच्या एक दिवस आधीच दुरुस्तीला सुरुवात झाली. ही बाब शेतकरी व ग्रामस्थांच्या एकजुटीच्या पाठपुराव्याचे महत्त्व अधोरेखित करणारी आहे. मात्र कामात दिरंगाई, निकृष्ट दर्जा किंवा पुन्हा पाणीगळतीचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांच्या पाणी हक्कासाठी कृती समितीचा पाठपुरावा व आंदोलनाची भूमिका कायम राहील. सोनवडी बंधारा कृती समिती म्हणून दौंड शिरूर श्रीगोंदा तालुक्यातील सर्व शेतकरी, शिवाजीराव नांदखिले, आप्पासाहेब पवार भाजप नेते, गणेश जगताप, अखिल भारतीय ग्राहक पंचायत समिती व असंख्य शेतकरी या कृती समितीमध्ये सामिल होऊन आंदोलनाची हाक देण्यात आली होती.

## निवडणूक जाहिरातींसाठी एमसीएम सीचे पूर्व प्रमाणीकरण बंधनकारक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पुणे विभाग पदवीधर, शिक्षक द्विवार्षिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती कार्यान्वित करण्यात आली आहे. निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येणारे बल्क एसएमएस, रेकॉर्डेड व्हाईस मेसेज, इलेक्ट्रॉनिक माध्यमे तसेच डिजिटल मीडिया जाहिरातींचे समितीकडून पूर्व प्रमाणीकरण करून घेणे बंधनकारक असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

निवडणूक प्रचारासाठी राजकीय पक्ष, उमेदवार तसेच त्रयस्थ व्यक्तींकडून विविध माध्यमांचा वापर केला जातो. या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रे आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील पेड न्यूजवर समितीकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.

दूरचित्रवाणी, केबल वाहिनी, सिनेमा हॉल, रेडिओ, एफएम वाहिन्या, सार्वजनिक ठिकाणी प्रसारित होणाऱ्या दृक-श्राव्य जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्डेड व्हाईस मेसेज तसेच सोशल मीडिया आणि इंटरनेट संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या राजकीय जाहिरातींचे प्रमाणीकरण आवश्यक आहे.उमेदवारांच्या राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससून सर्वोपचार रुग्णालयासमोर, पुणे येथे जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२१३०७ किंवा ई-मेल diopunegmail.com वर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासनाने केले आहे.

## मतदार यादी निरीक्षकांचा १६ ऑक्टोबरला पुणे दौरा

### मतदार नोंदणी अधिकारी आणि मतदारांशी साधणार संवाद; मतदान केंद्रांची पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अनुषंगाने पुणे विभागाच्या विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक शीतल तेली-उगले यांचा पुणे जिल्ह्याचा दुसरा दौरा शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातून दौऱ्याला सुरुवात होईल. त्यानंतर पुरंदर, बारामती, इंदापूर आणि दौंड तालुक्यांतील विविध मतदान केंद्रांची पाहणी करण्यात येणार आहे. सायंकाळी ७.३० वाजता वरवंड येथे दौऱ्याची सांगता होईल.

दौऱ्यात जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीसह विविध मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि मतदारांशी संवाद साधून मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामकाजाचा आढावा घेतला जाईल. मतदार यादीसंदर्भातील अडचणी आणि तक्रारी नागरिकांना मतदार यादी निरीक्षकांसमोर मांडता येणार आहेत.

## बजाज पुणे ग्रँड टूरला यूसीआय २.१ श्रेणी; २६ ते ३१ जानेवारीदरम्यान सहा टप्प्यांत स्पर्धा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** बजाज पुणे ग्रँड टूरला यूसीआय २.२ वरून यूसीआय २.१ अशी श्रेणीवाढ मिळाली असून, स्पर्धेची २०२७ मधील दुसरी आवृत्ती २६ ते ३१ जानेवारीदरम्यान पुणे आणि जिल्ह्यातील विविध भागांत सहा टप्प्यांत होणार आहे. या श्रेणीवाढीमुळे अधिक मजबूत आंतरराष्ट्रीय संघ आणि सायकलपटू सहभागी होण्याची शक्यता असून, भारतीय सायकलपटूंना अनुभवी आंतरराष्ट्रीय खेळाडूंसोबत स्पर्धा करण्याची संधी मिळणार आहे.

मॉन्ट्रियल, कॅनडा येथे झालेल्या यूसीआय काँग्रेसमध्ये पुण्याला २०३२ च्या यूसीआय रोड वर्ल्ड चॅम्पियनशिपचे यजमानपद देण्याचा निर्णय झाला. भारतात प्रथमच होणाऱ्या या जागतिक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर पुणे ग्रँड टूरला मिळालेली श्रेणीवाढ महत्त्वाची मानली जात आहे.

जानेवारी २०२६ मधील पहिल्या आवृत्तीत ३५ देशांतील २९ संघ आणि १७१ सायकलपटूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेच्या मार्गावर सुमारे २५ लाख नागरिकांनी उपस्थित राहून सायकलपटूंना प्रोत्साहन दिले. या प्रतिसादामुळे पुणे ग्रँड टूरने भारतीय सायकलिंगच्या आंतरराष्ट्रीय कॅलेंडरमध्ये स्थान निर्माण केले.

२०२७ मधील स्पर्धेचा पहिला टप्पा मुळशी ते हिंजवडी, दुसरा बारामती ते सासवड, तिसरा जुन्नर ते राजगुरुनगर, चौथा आळंदी ते लोणावळा-खंडाळा, पाचवा लोणावळा-खंडाळा ते हिंजवडी आणि सहावा पिंपरी-चिंचवड ते बालगंधर्व रंगमंदिर असा असेल. शहरी व ग्रामीण रस्ते, टेकड्या, ऐतिहासिक स्थळे आणि पश्चिम घाटातील आव्हानात्मक मार्गांमुळे सायकलपटूंच्या वेग, सहनशक्ती आणि कौशल्याची कसोटी लागणार आहे.

यूसीआय अध्यक्ष डेव्हिड लापार्टिएंट यांनी पुणे ग्रँड टूरला भारतातील रोड सायकलिंगच्या विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे म्हटले आहे. यूसीआय २.१ श्रेणीमुळे उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेला चालना मिळणार असून, पुणे २०३२ जागतिक स्पर्धेच्या आयोजनाच्या दृष्टीनेही त्याचा फायदा होणार आहे.

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी श्रेणीवाढ ही भारतीय सायकलिंगसाठी महत्त्वाची उपलब्धी असल्याचे सांगितले.

## पुरंदरच्या दुष्काळी मदतीला तांत्रिक अडथळ्यांचा फटका

### ई-पीक पाहणीतील अडचणींमुळे शेतकरी हैराण

अनिकेत नितीन काळे । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** शासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या यादीत पुरंदरचा समावेश केल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. मात्र, मदतीच्या प्रक्रियेतच तांत्रिक अडचणींचा अडसर निर्माण झाल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. ई-पीक पाहणीसाठी स्मार्टफोनची उपलब्धता, सातबारा उतारा काढताना येणाऱ्या सर्व्हरच्या अडचणी तसेच शेताच्या ठिकाणी लोकेशन टॅगिंगमध्ये निर्माण होणाऱ्या त्रुटींमुळे नुकसानभरपाईची प्रक्रिया रखडत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अनेक भागांत पाण्याअभावी पिकांची अवस्था बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून जाहीर करण्यात आलेली मदत वेळेत मिळणे गरजेचे आहे. मात्र, ई-पीक पाहणीच्या प्रक्रियेतच अडथळे येत असल्याने पात्र शेतकऱ्यांसमोर नव्या अडचणी उभ्या ठाकल्या आहेत.

**ई-पीक पाहणीसाठी स्मार्टफोनचा अडसर**

ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन उपलब्ध नसल्याने ई-पीक पाहणीची नोंद करणे अडचणीचे ठरत आहे.



काही शेतकरी तांत्रिकदृष्ट्या सक्षम नसल्याने त्यांनाही या प्रक्रियेसाठी इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे. शासनाचे कर्मचारी अथवा संबंधित सहाय्यक प्रत्यक्ष शेतात पोहोचल्यानंतरही काही ठिकाणी मोबाईल नेटवर्क आणि लोकेशन टॅगिंगच्या अडचणी निर्माण होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

काही वेळा प्रत्यक्ष शेताच्या ठिकाणी असतानाही मोबाईलमध्ये दाखविले जाणारे लोकेशन वेगळ्या ठिकाणी नोंदविले जात असल्याची तक्रार आहे. त्यामुळे पीक पाहणीची नोंद पूर्ण करताना अडथळे निर्माण होऊन पात्र शेतकऱ्यांनाही नुकसानभरपाईपासून वंचित राहण्याची भीती व्यक्त होत आहे.

**कागदपत्रांसाठीही आर्थिक भुर्दंड**

नुकसानभरपाईचा अर्ज सादर करताना सातबारा, आठ-अ, पिकांचे रंगीत छायाचित्रे तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. या कागदपत्रांसाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सुमारे ५०० रुपये किंवा त्याहून अधिक खर्च करावा लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

काही केंद्रांवर रंगीत झेरॉक्स, प्रिंट आणि इतर कागदपत्रांसाठी अतिरिक्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारीही पुढे आल्या आहेत.

आधीच दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर नुकसानभरपाई मिळविण्यासाठीच्या प्रक्रियेचाच अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

**प्रक्रिया सुलभ करण्याची गरज**
**दुष्काळ जाहीर करून केवळ मदतीची घोषणा करणे पुरेसे नसून, ती मदत प्रत्यक्ष पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर वेळेत जमा होणे आवश्यक आहे. त्यासाठी ई-पीक पाहणीतील तांत्रिक त्रुटी दूर करणे, लोकेशन टॅगिंगची अडचण सोडविणे, सर्व्हरची क्षमता वाढविणे आणि आवश्यक कागदपत्रांच्या अटी शक्य तितक्या सुलभ करणे गरजेचे आहे.**



## दुष्काळग्रस्त पिकांचे पंचनामे सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**दौंड :** शासनाने दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये दौंडचा समावेश केल्यानंतर तालुक्यातील दुष्काळामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. बोरीऐंदी व ताम्हणवाडी गटातील नुकसानग्रस्त शेतीची जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष पाहणी केली.

या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे, उपकृषी अधिकारी संतोष मोरे, सहाय्यक कृषी अधिकारी पंढरीनाथ कुतवळ, शैलेश मोरे, विनायक जगताप व सूरज बाबर यांनी ४ ऑक्टोबर रोजी शेतांची पाहणी केली. नुकसानीच्या नोंदी अचूक व वस्तुनिष्ठ पद्धतीने घेऊन पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येणार असल्याचे तांबे यांनी सांगितले.

पावसाअभावी सोयाबीन व बाजरी पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी पिके वाळून गेली आहेत. विहिरी व कूपनलिकांनीही तळ गाठल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतीसाठी केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी पाहणी पथकासमोर आपल्या अडचणी मांडल्या. यावेळी शेतकऱ्यांशी चर्चा करून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. पाहणीवेळी बाधित शेतकऱ्यांसह बोरीऐंदी येथील संदिप गायकवाड, ताम्हणवाडीचे माजी सरपंच संदिप ताम्हाणे उपस्थित होते.

# कारखान्यांपेक्षा दुष्काळाकडे लक्ष द्या!

## बैलगाड्यांसह इंडिया आघाडीचा सरकारविरोधात धडक मोर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर** : अहिल्यानगर जिल्ह्यात दुष्काळाची तीव्रता वाढत असताना शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करत इंडिया आघाडीच्या वतीने अहिल्यानगर येथे बैलगाड्यांसह सरकारविरोधात धडक मोर्चा काढण्यात आला. कारखान्यांपेक्षा दुष्काळाकडे लक्ष द्या असा संदेश देत शेतकऱ्यांना पाणी, जनावरांना चारा आणि दुष्काळग्रस्तांना तातडीची आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी मोर्चातून करण्यात आली. दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी आणि पशुपालक मोठ्या संकटात सापडले आहेत. अनेक भागांत पाण्याचा प्रश्न गंभीर असून पशुधनासाठी चारा उपलब्ध होण्याबाबतही अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने केवळ घोषणा न करता दुष्काळग्रस्त भागात प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका इंडिया आघाडीच्या नेत्यांनी मांडली.

मोर्चाला संबोधित करताना अंबादास दानवे यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित केला. जिल्ह्यात मोठमोठे कारखानदार असले तरी सध्या कारखान्यांपेक्षा दुष्काळाच्या प्रश्नाकडे शासनाने प्राधान्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मोठ्या उद्योगांना मदत करण्यापेक्षा दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी आणि पशुधनाला मदत करणे आवश्यक आहे. जनावरांना चारा आणि पाणी मिळणे ही तातडीची गरज असून शासनाने त्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनाकडून घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्ष मदत किती मिळत आहे, असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला. दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन गावागावांत पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. खासदार नीलेश लंके यांनीही सरकारवर टीका करत जनतेच्या




प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मोर्चे काढावे लागत असल्याचे सांगितले. दुष्काळ, पेपरफुटी आणि एसआयआर यांसारख्या प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळाचे वास्तव अधोरेखित करण्यासाठी मोर्चात बैलगाड्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होता. शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या बैलगाड्यांसह निघालेल्या मोर्चातून ग्रामीण भागातील दुष्काळाची परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी, शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक मदत आणि पशुधनासाठी चारा-पाण्याची व्यवस्था तातडीने करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

या मोर्चात आमदार सुनील शिंदे, प्रताप पाटील शेळके, संपतराव म्हस्के, बाळासाहेब हराळ, माधवराव लामखडे, सिताराम काकडे, योगीराज गाडे, संदीप वर्पे, राजेंद्र दळवी, किरण काळे, शिवा पाटील होळकर, संजय गारुडकर, अरुण म्हस्के, अर्जुन भालेकर, डॉ. भास्कर शिरोळे, रामेश्वर निमसे, निलेश मालपाणी, रामदास गोल्हार, जगदीश चौधरी, सचिन कोते, किरण पाटील, सचिन गुजर, दीप चव्हाण, ड. सुभाष लांडे, बन्सी सातपुते, प्रवीण सोनवणे, राजू आघाव, मनसेचे सचिन डफळ, योगिता राजळे, अर्चना गायकवाड, सुवर्णा धाडगे यांच्यासह इंडिया आघाडीतील विविध तालुकाध्यक्ष तसेच विविध फ्रंटल संघटनांचे अध्यक्ष उपस्थित होते. यावेळी विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. सरकारविरोधात घोषणाबाजी करीत दुष्काळग्रस्त शेतकरी आणि पशुपालकांच्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले.

दुष्काळग्रस्त भागातील पाणीटंचाई दूर करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे, पशुधन वाचविण्यासाठी आवश्यक मदत करणे आणि शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देणे या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली. घोषणा नकोत, आता प्रत्यक्ष मदत आणि निर्णय हवेत, असा संदेश देत शासनाने दुष्काळग्रस्तांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा इंडिया आघाडीच्या वतीने देण्यात आला.

---

**द • ख • ल**

## जिल्हा बँक निवडणुकीत नामनिर्देशन छाननीवरून वाद

**अहिल्यानगर** : अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सन २०२६ ते २०३१ या पंचवार्षिक संचालक मंडळाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नामनिर्देशनपत्रांच्या छाननीवरून वाद निर्माण झाला आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघ, राहाता येथील उमेदवारीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयासह महिला राखीव मतदारसंघातील नामनिर्देशनपत्र नामंजूर केल्याच्या निर्णयाविरोधात ड. सुरेश लगड यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा बँकेचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी वैध नामनिर्देशनपत्रांची यादी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे.

राहाता येथील प्राथमिक कृषी पतपुरवठा विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मतदारसंघातून सुजय राधाकृष्ण विखे यांनी दाखल केलेल्या नामनिर्देशनपत्रावर ड. लगड यांच्या पक्षकार एकनाथ चंद्रभान घोगरे यांनी ६ ऑक्टोबर २०२६ रोजी हरकत घेतली होती. मात्र, संबंधित हरकत फेटाळून सुजय विखे यांचे नामनिर्देशनपत्र वैध ठरविण्यात आले असून, त्याबाबतची यादी निवडणूक कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या निर्णयाबरोबरच महिला राखीव मतदारसंघातून ड. लगड यांच्या पक्षकार शैलजा अमृत धुमाळ यांनी दाखल केलेले नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यात आल्याचा आक्षेपही तक्रारीत घेण्यात आला आहे. या दोन्ही निर्णयांविरोधात योग्य त्या न्यायालयात दाद मागण्याची तयारी असल्याचे ड. लगड यांनी स्पष्ट केले आहे.

न्यायालयीन दाद मागण्यासाठी उपलब्ध असलेली मुदत अवघी तीन दिवसांची असल्याने संबंधित निर्णयांची तसेच छाननी प्रक्रियेशी निगडित कागदपत्रांची प्रमाणित प्रत तातडीने मिळणे आवश्यक असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सुजय विखे यांच्या नामनिर्देशनपत्राबाबत घेण्यात आलेली हरकत, ती फेटाळण्याचा निर्णय, तसेच शैलजा धुमाळ यांचे नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्यासंदर्भातील निर्णय व अन्य आवश्यक कागदपत्रांच्या प्रमाणित नकलांची मागणी करण्यात आली आहे. बुधवारी संपूर्ण दिवस निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित नसल्याने कागदपत्रांच्या प्रमाणीत नकला मिळू शकल्या नाही. अनेक लोकांना माघारी जावे लागले. याला सर्वस्वी जबाबदार निवडणूक अधिकारी मंगेश सुरवसे असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

## जामखेडमध्ये अतिक्रमण दुसऱ्या दिवशी सुरू असतांना अचानक थांबले चर्चांना उधान

**जामखेड** : जामखेड शहरातील महामार्गाच्या हद्दीत करण्यात आलेल्या अतिक्रमणांविरोधात अखेर प्रशासनाने धडक कारवाई सुरू केली आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता बीड रोडवरील शासकीय दूध डेअरी परिसरापासून अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात करण्यात आली.तर दुसर्या दिवशी बुधवारी देखील दुपार पर्यंत अतिक्रमण काढण्याचष्ट्री काम सुरू असताना अचानक थांबले यावर अधिकारी काहीही बोलण्यास तयार नाही महामार्गाच्या गटारापासून दोन्ही बाजूंना सुमारे तीन मीटर अर्थात दहा फूट अंतरातील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई करण्यात येत आहे.असा नियम नगरपरिषदेने दाखवत अतिक्रमण काढण्यायास सुरुवात केली आणि दि सात रोजी काही ठिकाणी पंधरा फुटाचे मोजमाप केले यावरून अधिकारी काहीही बोलण्यास नकार दिला आहे. सदर कारवाईत महसूल प्रशासन, जामखेड नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पोलीस प्रशासन संयुक्तपणे मैदानात उतरले आहे.

तहसीलदार शितल सावळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी तसेच राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी आपल्या पथकांसह कारवाईच्या ठिकाणी उपस्थित आहेत.जामखेड शहरातील अतिक्रमणाचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून प्रलंबित होता.तीन वर्षांपासून रखडलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेला अखेर सुरुवात झाल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. शहरातील वाहतूक सुरळीत होण्यास तसेच रस्ते मोकळे होण्यास या कारवाईचा फायदा होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, प्रशासनाने ही कारवाई केवळ एका भागापुरती मर्यादित न ठेवता संपूर्ण शहरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबविली जाणार आहे . कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे. कारवाई करताना प्रशासनाने सर्व अतिक्रमणांवर समान निकषाने आणि नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षाही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## जामखेडला गरिबांचे धंदे उध्वस्त बड्या इमारती व वजनदार व्यापारीच्या अतिक्रमनसमोर अधिकारी नमते

**जामखेड** : जामखेड शहरातील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि राष्ट्रीय महामार्गाच्या कामातील अडथळे दूर करण्यासाठी प्रशासनाने सुरू केलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेचा दुसऱ्याच दिवशी पुरता फज्जा उडाला आहे. बीड रोडवरील गरिबांच्या टपऱ्या आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यांवर १० फुटांपर्यंत हातोडा चालवणाऱ्या प्रशासनाची मोहीम समर्थ हॉस्पिटल ते बीड रोड कॉर्नर दरम्यान येताच अचानक मंदावली आहे. राष्ट्रीय महामार्ग विभागाचे उपअभियंता चेमटे आणि त्यांच्या पथकाकडून नगरपरिषद प्रशासनाला अपेक्षीत सहकार्य मिळत नसल्याने या संपूर्ण कारवाईच्या हेतूवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

बड्या व्यापाऱ्यांना आणि मोठ्या इमारतींना वाचवण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी स्वतःला बड्यांच्या दावणीला बांधत आहेत का, असा संतप्त सवाल आता जामखेडकर जनता विचारत आहे.

गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या या मोहिमेचा श्रीगणेशा मंगळवारी सकाळी १० वाजता बीड रोडवरील शासकीय दूध डेअरी परिसरापासून महसूल, नगरपरिषद, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने झाला. तहसीलदार शितल सावळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे आणि पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या उपस्थितीत राष्ट्रीय महामार्गाच्या गटारापासून दोन्ही बाजूंना सुमारे १० फूट (३ मीटर) अंतरातील अतिक्रमणे हटवण्यास धडक सुरुवात झाली. पहिल्या दिवशी लहान-मोठ्या टपऱ्या आणि बाजार समितीचे गाळे पाडून रस्ता मोकळा करण्यात आला. मात्र, बुधवारी दुसऱ्या दिवशी मोहिमेतील 'हवा' अचानक काढली गेली.

---

## कर्जतचा नव्याने विकास करतांना नागरीकांना विचारात घ्यावे - नितीन तोरडमल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : अहिल्यानगर जिल्ह्याची २००५-०६ ची प्रादेशिक योजना मंजूर होत ती अंमलात देखील आणली गेली. मात्र यात कर्जत नगरपंचायतीचा प्रारूप विकास आराखडा तयार करताना पदाधिकारी तसेच मुख्याधिकारी कर्जत यांना विश्वासात घेण्यात आले नसून हा विकास आराखडा तात्काळ नामंजूर करावा. तसेच नवीन आराखडा तयार करताना शहरातील व्यापारी, उद्योजक व लगतचे शेतकरी यांना विचारात घ्यावा अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख डॉ नितीन तोरडमल यांनी केली. यावेळी पत्रकार परिषदेस जेष्ठनेते बापूसाहेब नेटके, सुभाष मांडगे उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी २००५-०६ साली प्रादेशिक योजना मंजूर झाली असून अंमलात आलेली आहे. सदर प्रादेशीक योजनेत कर्जत शहरालगतचे रहिवास क्षेत्र ठेवलेले आहे. तेवढेच क्षेत्र

प्रारुप विकास आराखडयात दर्शविले गेले असून त्यामध्ये वाढ करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे. वास्तविक पाहता प्रारुप विकास आराखडा तयार करताना सहभाग धारकांना विचारात घेण्यात आले नसून मुख्याधिकारी कर्जत व पदाधिकारी नगरसेवकांना देखील याची कल्पना दिली गेली नाही. शासकीय आरक्षणे (समाजकल्या विभागाचे मागासवर्गीय मुलांच शासकीय वसतीगृह) दर्शविण्यात आलेली नाहीत. कर्जत शहराच्या दक्षिण भागात थोडेच क्षेत्र रहिवास विभागात वाढविण्यात आले असल्याचे प्राथमिक बाबीत सिद्ध होत आहे. सदरचा प्रारुप विकास आरखडा तयार करताना कोणालाही विश्वासात न घेता तयार केल्यामुळे लगतचे शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे. तरी कर्जत नगर पंचायतीचा प्रारुप विकास आराखडा रद्द करावा व तदनंतर प्रारुप विकास आरखडा तयार करताना शहारातील व्यापारी, उद्योजक व लगतचे शेतकरी यांना विचारात घेण्यात यावा अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे कर्जत तालुकाप्रमुख डॉ नितीन तोरडमल यांनी पत्रकार परिषदेत केली. या आशयाचे निवेदन तोरडमल यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्याधिकारी कर्जत नगरपंचायत, नगररचना विभाग पुणे आणि अहिल्यानगर यांना दिले आहे.

## जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत आमदार काशिनाथ दाते की राहुल शिंदे एवढीच काय ती उमेदवारीची उस्तुकता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : पारनेर सोसायटी मतदारसंघातून विखे पाटील - थोरात यांच्या सहमती एक्स्प्रेस मधून आमदार काशिनाथ दाते की राहुल शिंदे या दोघांपैकी कुणाला उमेदवारी मिळणार याविषयी पारनेर तालुक्यात उस्तुकता निर्माण झाली असून शिंदे यांना उमेदवारी द्यायचीच होती तर आमदार दाते सर यांना विखे पाटील यांनी उमेदवारी अर्ज भरण्यास का सांगितले असा प्रश्न आमदार दाते यांचे कार्यकर्ते करीत असून शिंदे यांना जिल्हा परिषद शब्द देऊन सध्या तरी त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला जाईल अशीच शक्यता निर्माण झाली आहे.

तालुक्यातून या वेळी सर्वाधिक उमेदवार अर्ज विविध मतदारसंघातून दाखल झाले असून सोसायटी मतदारसंघातून विरोधी उमेदवार खासदार नीलेश लंके यांनी निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली असून सोसायटी मतदारसंघातील ४५ ते ४८ उमेदवारांची एकत्रित बैठक घेऊन त्यांनी चाचपणी केली असून आपला विजय निश्चित असल्याचे त्यांच्या कार्यकर्त्यांनी सांगितले आहे.

सोसायटी मतदारसंघात सहमती एक्स्प्रेस मधून जी एस महानगर बँकेच्या चेअरमन तथा जिल्हा सहकारी बँकेच्या माजी संचालिका श्रीमती गीतांजली शेळके यांनी मात्र महिला आणी सोसायटी दोन मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केल्याने त्यांना महिला मतदारसंघातून उमेदवारी मिळण्याची खात्री व्यक्त करण्यात येत आहे. बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघ व ईतर मागासवर्गीय मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला असून त्यांच्या पत्नी सोनल गायकवाड यांनी महिला मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मात्र आपल्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांनी उमेदवारीचा शब्द दिला असल्याचे ते सांगत असले तरी सहमती एक्स्प्रेस नेते त्यांचा पत्ता कट करतील अशी शक्यता निर्माण झाली आहे.

खडकीचे संजय मोतीलाल कर्नावट, भाळवणीचे माजी सरपंच तथा बाजार समीतीचे माजी सभापती तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब तरटे, रावसाहेब रोहकले यांनीही बिगरशेती मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

---

## नामदार राधाकृष्ण विखे पाटील व ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज** : जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे यांनी भेट घेवून त्यांच्या तब्येतीची चौकशी केली.दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या भेटीत पाणीटंचाई, दुष्काळी परिस्थिती आणि भविष्यातील जलव्यवस्थापनाच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाली. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी केवळ तात्पुरत्या उपाययोजनांवर अवलंबून न राहता जलसंधारणाच्या कामांना अधिक प्राधान्य देण्याच्या त्यांच्या सूचनेची अमंलबजावणी करणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले

मध्यंतरी अण्णा हजारे उपचारांसाठी मुंबई येथे रूग्णालयात दाखल झाले असताना त्यांची भेट घतली होती.उपचारानंतर पुन्हा राळेगण येथे अण्णा हजारे आल्याचे समजल्यानंतर पारनेर येथील टंचाई आढावा बैठक झाल्यानंतर मंत्री विखे पाटील यांनी



त्यांची गावातील यादवबाबा मंदिरात भेट घेवून विविध विषयांवर चर्चा केली.विनायक देशमुख सुजित झावरे अशोकराव सावंत यावेळी उपस्थित होते. मंत्री विखे यांनी त्याच्या तब्येतीची चौकशी केली.राज्यातील दुष्काळी परीस्थीतीच्या अनुषंगाने दोघांमध्ये चर्चा झाली.शासनाकडून सुरू असलेल्या उपाय योजनांची माहीती मंत्री विखे यांनी दिली.

गावागावांत पाणी अडविणे, पाणी जिरविणे, नाला खोलीकरण, बंधारे, गाळ काढणे तसेच उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन यावर सातत्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज चर्चे दरम्यान अण्णा हजारे यांनी अधोरेखित केली. पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणावर वाहून जाण्याऐवजी ते स्थानिक पातळीवर अडवून भूजलपातळी वाढविण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे आवश्यक असल्याचेही अण्णा हजारे यांनी सांगितले. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी न राहता लोकसहभागातून व्यापक चळवळ उभी राहिली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. आजची दुष्काळी परिस्थिती ही भविष्यासाठी जलव्यवस्थापनाचे धडे देणारी आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब अडविणे आणि जिरविणे यासाठी गावपातळीवर नियोजन करून जलसंधारणाच्या कामांना गती देणे आवश्यक आहे, हा मोलाचा शासन कृतीत उतरविण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल आशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.

एकीकडे दुष्काळी परीस्थीती असतानाही राळेगण मध्ये पुर्वी झालेली जलसंधारणाची काम वृक्ष लागवड आणि पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्यासाठी झालेल्या कामामुळे वनराई टिकून आहे. त्याच पध्दतीने दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारण, पाण्याचा काटकसरीने वापर आणि लोकसहभाग या तीनही बाबींना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक गावात काम काम होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. आणी विखे पाटील यांच्या कडे जलसंपदा सारखे महत्त्वाचे खाते आहे. विखे पाटील यांचा मंत्रिमंडळात मोठा अनुभव आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून हजारो कोटी रुपयांचा निधी सरकार देत असून राज्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी हा विभाग अतिशय कार्यक्षमपणे काम करीत असल्याचे हजारे यांनी यावेळी सांगितले.

---

## दिवाळीपूर्वी पेन्शनसह वेतन आयोगाचे थकीत हप्ते द्या

### अन्यथा १३ ऑक्टोबरपासून महापालिकेत पेन्शनर्सचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ५व्या वेतन आयोगाचे थकीत फरकाचे हप्ते, ६व्या वेतन आयोगाचे संपूर्ण आठ हप्ते तसेच नियमित पेन्शन दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महानगरपालिका पेन्शनर असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागण्यांबाबत प्रधान सचिव, महापालिका आयुक्त, महापौर व उपमहापौर यांना नोटीस देण्यात आली असून, मागण्यांवर दि. १२ ऑक्टोबरपर्यंत कार्यवाही न झाल्यास दि. १३ ऑक्टोबरपासून महापालिकेसमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि. ७ ऑक्टोबर) कास्ट्राईबच्या जिल्हा परिषद येथील कार्यालयात संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. बैठकीत महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. दिवाळीचा सण तोंडावर असताना अनेक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेतन आयोगाची थकीत रक्कम आणि वेळेवर पेन्शन मिळत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

संघटनेच्या म्हणण्यानुसार,



महापालिकेतील सेवानिवृत्त ५०६ कर्मचाऱ्यांना न्यायालयीन निर्णयानुसार ५व्या वेतन आयोगाचा फरक मिळणे अपेक्षित आहे. तसेच ६व्या वेतन आयोगाचे आठ हप्ते अद्याप प्रलंबित असून, त्याची अंदाजे रक्कम ६० ते ६५ लाख रुपये आहे. ही संपूर्ण थकीत रक्कम दिवाळीपूर्वी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेतील कायम कर्मचाऱ्यांना ११ हजार रुपये बोनस व सानुग्रह अनुदान एकरकमी देण्याबाबत निर्णय घेतल्याबद्दल संघटनेने प्रशासनाचे आभार मानले. मात्र, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या थकीत वेतन आयोगाच्या रकमेबाबत अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दरमहा वेळेवर पेन्शन मिळत नसल्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित करण्यात आला. पेन्शन उशिरा मिळत असल्यामुळे औषधोपचार, दैनंदिन खर्च आणि इतर गरजा भागविताना पेन्शनर्सना अडचणी येत असल्याचे संघटनेने नमूद केले. त्यामुळे दरमहा पेन्शनची रक्कम प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत मिळावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

संघटनेने प्रशासनाकडे तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये न्यायालयीन निर्णयानुसार सेवानिवृत्त ५०६ कर्मचाऱ्यांना ५व्या वेतन आयोगाचा फरक देणे, ६व्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते म्हणजेच अंदाजे ६० ते ६५ लाख रुपयांची रक्कम दिवाळीपूर्वी देणे आणि दरमहा पेन्शन ५ तारखेपर्यंत अदा करणे, या मागण्यांचा समावेश आहे.

मागण्यांवर दि. १२ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सकारात्मक कार्यवाही करावी, अन्यथा दि. १३ ऑक्टोबरपासून महापालिका कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नोटीसमधून देण्यात आला आहे. आंदोलनाची पुढील दिशा बैठकीत निश्चित करण्यात आली. बैठकीस वसंत थोरात, अन्वर शेख, आर. जी. शेख, नवनाथ भालेराव, वसंत गायकवाड, राजेंद्र सस्कर, रामदास वखारे, विलास भिंगारदिवे, डी. एम. फडके, अनिस पठाण, रविंद्र गणगळे, मिलिंद वैद्य, आर. के. गावडे, ए. ए. देशपांडे, संजय मुठाळ, दिगंबर टेपाळे, विनोद शिंदे, दिलीप पाठक आदींसह सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## घोड धरणात वाळू माफियांचा धुमाकूळ!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील वडगाव शिंदोडी येथील घोड धरणात बेकायदा वाळू उपसा सुरू असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. धरणातील वाळू उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारी यांत्रिक बोट ग्रामस्थांनी पकडून महसूल विभागाच्या ताब्यात दिली. या कारवाईमुळे घोड धरणातील अवैध वाळू उपशाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

घोड धरणातील पाण्यात यांत्रिक साधनांच्या सहाय्याने वाळू उपसा सुरू असल्याची माहिती मिळताच संतप्त ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांनी संबंधित यांत्रिक बोट पकडून महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली. महसूल यंत्रणेच्या नजरेसमोर हा प्रकार सुरू होता का? असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

बोट ताब्यात; पुढे कारवाई कोणावर?

यांत्रिक बोट ताब्यात घेण्यापलीकडे महसूल विभाग वाळू उपशामागील सूत्रधार आणि संबंधितांवर काय कारवाई करणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. केवळ बोट पकडून प्रकरण थंडावू न देता बेकायदा वाळू उपशाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. घोड धरणातील वाळू उपशाचा हा प्रकार महसूल विभागासाठीही कसोटी ठरणार असून, आता 'बोट' पकडली; पण 'बडे मासे' पकडणार कोण? असा सवाल परिसरात चर्चिला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



# मोदींची २५ वर्षांची कारकीर्द संकल्प, संघर्ष आणि राष्ट्रसेवेला समर्पित

## 'विकसित भारत संकल्प सभे'त ना. विखे पाटील यांचे गौरवोद्गार; अहिल्यानगरात सेवा ज्योत यात्रा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची २५ वर्षांची सार्वजनिक जीवनातील कारकीर्द संकल्प, संघर्ष, संघटन, विकास आणि राष्ट्रसेवेला समर्पित राहिली आहे. विरासत आणि विकासाचा समन्वय साधत त्यांनी विकसित भारताच्या वाटचालीला दिशा दिली असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.




पंतप्रधान मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या वाटचालीनिमित्त भाजपच्या वतीने अहिल्यानगरात 'विकसित भारत संकल्प सभा' आयोजित करण्यात आली होती. यावेळी मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सभेनंतर शहरातून सेवा ज्योत यात्रा काढण्यात आली. महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून महाविशाल गणपती मंदिरात मोदी यांच्या दीर्घायुष्यासाठी महाआरती करण्यात आली.

मोदी यांच्या २५ वर्षांच्या प्रवासाकडे केवळ राजकीय कारकीर्द म्हणून पाहता येणार नाही. प्रशासन, विकास आणि जनसहभाग केंद्रस्थानी ठेवून त्यांनी काम करण्याचा आदर्श निर्माण केला, असे विखे पाटील म्हणाले. जनधन, घरकुल, आयुष्मान भारत, डिजिटल व्यवहार, यूपीआय, आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया यांसारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिक विकास प्रक्रियेशी जोडला गेल्याचा दावा त्यांनी केला. कृषी, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास, उत्पादन, तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रातही देशाने प्रगती केली असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, माध्यमांशी बोलताना विखे पाटील यांनी इंडिया आघाडीवरही टीका केली. निवडणूक आयोगाच्या विरोधातील आंदोलनामागे देशात अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. जनाधार गमावल्यामुळे हे आंदोलन सुरू असल्याची टीकाही त्यांनी केली. यापूर्वी राहुल गांधी यांनी परदेशात जाऊन संविधानिक संस्थांवर टीका केल्याचा आरोप त्यांनी केला.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करून मार्ग काढला असून, काही जण विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे राजकीय भांडवल करीत असल्याचा आरोपही विखे पाटील यांनी केला. विकसित भारताच्या निर्मितीसाठी सर्वांनी कटिबद्ध होण्याचे आवाहन त्यांनी केले.

# दिंडीत कंटेनर घुसवणाऱ्या चालकाला ३ वर्षे कारावास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव** : रस्त्यावर बेजबाबदारपणे आणि निष्काळजीपणाने वाहन चालवून इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्या वाहनचालकांसाठी संगमनेर जिल्हा व सत्र न्यायालयाने एक कडक व संदेश देणारा निकाल दिला आहे. २-३ वर्षांपूर्वी घडलेल्या एका भीषण अपघात प्रकरणात वारकऱ्यांच्या दिंडीत भरधाव कंटेनर घुसवणाऱ्या आरोपी चालकाला ३ वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे.

३ डिसेंबर २०२३ रोजी सायंकाळी ४:३० वाजेच्या सुमारास पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर (क्र. ६०) खंदरमाळवाडी शिवारातून वारकऱ्यांची दिंडी शिस्तबद्धपणे चालली होती. यावेळी आरोपी चालक छोटेलाल आलगु पाल याने अत्यंत बेजबाबदारपणे व भरधाव वेगात आपला कंटेनर दिंडीत घुसवला. या अपघातात ४ वारकरी चिरडले गेले, तर पालखी रथावर कंटेनर आदळल्याने १५ ते १६ वारकरी गंभीर जखमी झाले होते. अपघातानंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या चालकाला स्थानिकांनी पकडून घारगाव पोलिसांच्या स्वाधीन केले होते.

घारगाव पोलीस ठाण्याचे तत्कालीन पोलीस निरीक्षक संतोष बी. खेडकर यांनी या प्रकरणाचा अत्यंत चिकाटीने तपास करून न्यायालयात मजबूत दोषारोपपत्र दाखल केले होते. संगमनेर येथील जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश (क्र. २) श्री. एम. आर. नेरलेकर यांनी प्रत्यक्षदर्शी, साक्षीदार व पोलिसांच्या परिस्थितीजन्य पुराव्यांचा आधार घेत आरोपीला भारतीय दंड संहिता व मोटार वाहन कायद्यानुसार दोषी ठरवले.

न्यायालयाने आरोपीला भा.द.वि. कलम ३०४ (सदोष मनुष्यवध) अंतर्गत ३ वर्षे सश्रम कारावास, कलम २७९ (धोकादायक ड्रायव्हिंग) अंतर्गत ४ महिने, कलम ३३७ व ३३८ (गंभीर दुखापत) अंतर्गत अनुक्रमे ५ महिने व १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४/१८७ (अपघातानंतर पळून जाणे) अन्वये प्रत्येकी २ महिने साध्या कारावासाची शिक्षा दिली.

### वाहनचालकांसाठी कायदेशीर धडा....

महामार्गावरून किंवा गर्दीच्या ठिकाणाहून जात असताना वेगावर नियंत्रण नसणे आणि नियमांचे उल्लंघन करणे हे केवळ अपघातालाच आमंत्रण देत नाही, तर चालकाला थेट तुरुंगात ढकलून देऊ शकते, असा स्पष्ट संदेश या निकालातून न्यायालयाने दिला आहे.

या खटल्यात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता डॉ. श्रीमती रेश्मा युवराज जाधव यांनी सरकारी पक्षातर्फे मजबूत बाजू मांडली, तर पैरवी अधिकारी (सहा. फौजदार प्रवीण डावरे व सुरेश टकले) यांनी खटल्याचा सतत पाठपुरावा केला. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक मुमुका सुदर्शन व पोलीस उपअधीक्षक कुणाल सोनवणे यांनी तपास पथकाचे कौतुक केले आहे.

# कोल्हेंचा जिल्हा बँकेचा बिनविरोध मार्ग मोकळा, पण...

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : अहिल्यानगर जिल्हा बँकेसाठी कोपरगाव सोसायटी मतदारसंघातून संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे आणि आ. विवेक कोल्हे यांचे अर्ज वैध ठरले असून इतर अर्ज अवैध ठरल्याने कोल्हे यांचा जिल्हा बँकेचे संचालक म्हणून बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.दोन अर्ज कोल्हे कुटुंबातून असल्याने आगामी काळात कोणता अर्ज मागे घेतला जाणार आणि कोणाची वर्णी संचालक म्हणून या मतदारसंघातून लागणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बिपीनदादा कोल्हे यांचा चौफेर अभ्यासाचा आवाका आणि सहकार क्षेत्रात असलेली जाण ही अतिशय व्यापक आहे तर आ.विवेक कोल्हे यांच्याकडे असणारी नाविन्यतेची जिद्द व बहुआयामी अभ्यासाची क्षमता यातून जिल्हा बँकेच्या दृष्टीने आगामी काळात कोल्हे कुटुंबातील नक्की कोण प्रतिनिधित्व करणार हे मात्र अद्यापही गुलदस्त्यात आहे.



सबंध जिल्ह्याचे लक्ष लागलेली अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँक निवडणूक मोठ्या नाट्यमय घडामोडी घडून पुढे जाते आहे. बिनविरोधाचे वारे वाहू लागले असताना अचानक निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाण्याची देखील चर्चा जोर धरत असताना अनेक मतदारसंघात बहुतेकांचे मार्ग मोकळे झाले असून कोल्हे कुटुंबांचे जिल्हा बँकेच्या राजकारणात असलेले महत्व पाहता कोपरगाव मधून दोनच अर्ज वैध ठरल्याने अंतिम नाव कुणाचे ठेवले जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जामखेडमध्ये गुटखा माफियांवर एलसीबीची धडक

## भवरवाडी, पोकळेवस्तीत छापे; १ लाख ४१ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** : अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रीविरोधात अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) जिल्ह्यात धडक मोहीम सुरू केली असून, जामखेड तालुक्यातील भवरवाडी आणि पोकळेवस्ती येथे केलेल्या दोन कारवायांत १ लाख ४१ हजार ५१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या पथकाने ६ व ७ ऑक्टोबर रोजी ही कारवाई केली.



भवरवाडी येथे केलेल्या कारवाईत २८ हजार ३४० रुपयांचा गुटखा व तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला. याप्रकरणी अर्जुन गहिनीनाथ सोनटक्के (रा. भवरवाडी) याच्याविरुद्ध जामखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तर पोकळेवस्ती येथे केलेल्या दुसऱ्या कारवाईत १ लाख १३ हजार १७६ रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी श्वेत शिवाजी वीर (रा. पोकळेवस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आशुतोष शामराव रहाणे (रा. शिर्डी) आणि किरण बोराडे (रा. पाथरूड, ता. भूम, जि. धाराशिव) हे फरार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

दोन्ही प्रकरणांत भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जामखेड तालुक्यात अवैध गुटखा व तंबाखू विक्री करणाऱ्यांवर यापुढेही पोलिसांची करडी नजर राहणार असून, अशा धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# शेत रस्त्यावरून अपंग शेतकऱ्याला जीवे मारण्याची धमकी, दोघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेतजमिनीच्या रस्त्याच्या वादातून अपंग शेतकऱ्याला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील उंबरे शिवारात ५ ऑक्टोबर रोजी घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सतीश मार्कस पंडीत (वय ४९, रा. उंबरे माळवाडी बु., ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. पंडीत यांची उंबरे शिवारातील गट क्रमांक ५६/१/२ मध्ये शेती असून, त्यांच्या शेतालगत पांडुरंग वसंत गायकवाड यांची जमीन आहे. या जमिनीच्या रस्त्यावरून दोन्ही पक्षांमध्ये वाद सुरू आहे. संबंधित रस्त्याबाबत तहसीलदारांनी गायकवाड यांच्या बाजूने निर्णय दिला असून, त्याविरोधात पंडीत यांनी प्रांताधिकाऱ्यांकडे अपील केले आहे.

५ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास पंडीत हे शेतात कांद्याची रोपे टाकण्यासाठी व मशागतीसाठी गेले असता पांडुरंग गायकवाड व त्यांची पत्नी तेथे उपस्थित होते. जमिनीच्या निकालाचा दाखला देत त्यांनी पंडीत यांना शेतात येण्यास विरोध केला. यावरून झालेल्या वादातून शिवीगाळ करून, रस्ता मधूनच करणार असून, मध्ये आल्यास जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१(२), ३५२ तसेच अपंग व्यक्तींचे अधिकार अधिनियम, २०१६ मधील कलम ९२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# देसवंडी येथील ३७ वर्षीय शेतकरी बेपत्ता अपहरणाच्या संशयावरून गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील देसवंडी येथील ३७ वर्षीय शेतकरी निवृत्ती गोरक्षनाथ शिरसाठ हे घरातून कोणास काहीही न सांगता बेपत्ता झाल्याची घटना समोर आली. त्यांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने पळवून नेले असावे, असा संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निवृत्ती यांची आई मुक्ताबाई गोरक्षनाथ शिरसाठ,( वय ६८ वर्षे, रा. देसवंडी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार त्या पती गोरक्षनाथ, मुलगा निवृत्ती आणि नातू साई राजेंद्र आढाव यांच्यासह देसवंडी येथे राहतात. ते शेती व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

शिरसाठ कुटुंबाच्या शेजारी त्यांचे पुतणे अशोक दशरथ शिरसाठ, सतीश दशरथ शिरसाठ आणि गीताराम दशरथ शिरसाठ हे राहतात. घराच्या रस्त्यावरून दोन्ही कुटुंबांमध्ये पूर्वीपासून वाद असल्याचे फिर्यादीत म्हटले आले आहे. दि. ५ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजता कुटुंबातील सर्वजण जेवण करून झोपी गेले. त्यावेळी निवृत्ती गोरक्षनाथ शिरसाठ हे शेजारील खोलीत जाऊन झोपले होते. दुसऱ्या दिवशी दि. ६ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ६ वाजता मुक्ताबाई घराची साफसफाई करण्यासाठी गेल्या असता त्यांना निवृत्ती दिसून आले नाहीत.



यानंतर मुक्ताबाई आणि त्यांचा नातू साई यांनी परिसरात तसेच आजूबाजूला आणि नातेवाईकांकडे निवृत्ती यांचा शोध घेतला. मात्र बराच शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे निवृत्ती हे कोणास काहीही न सांगता घरातून निघून गेले असल्याचे सुरुवातीला लक्षात आले. मात्र तक्रारीत निवृत्ती यांना कोणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेले असावे, असा संशय व्यक्त करण्यात आला. त्यामुळे त्यांचा शोध घेऊन त्यांना तातडीने मिळवून देण्याची विनंती पोलिसांकडे करण्यात आली.

निवृत्ती गोरक्षनाथ शिरसाठ हे वय ३७ वर्षे असून ते शेती व्यवसाय करतात. ते देसवंडी, ता. राहुरी, येथील रहिवासी आहेत. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ११४४/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १४०(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून बेपत्ता निवृत्ती शिरसाठ यांचा शोध सुरू आहे.

# अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई; २५.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी/प्रवरानगर** : परवानगीपेक्षा अधिक वाळूची वाहतूक करून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याप्रकरणी लोणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. हायवा टिपरसह सुमारे २५ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार, दि. ७ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.१५ वाजता फत्याबाद पुलावर, मांडवे (ता. श्रीरामपूर) परिसरात ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांच्या माहितीनुसार, मालुंजा खुर्द (ता. राहुरी) येथील लिलावातील २ ब्रास वाळू वाहतुकीचा परवाना असताना संबंधित वाहनातून त्यापेक्षा अधिक म्हणजे सुमारे ६ ब्रास वाळूची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. वाहनचालक व वाहनमालक यांनी संगनमत करून विनापरवाना वाळू वाहतूक केल्याचा आरोप आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी टाटा हायवा कंपनीचा टिपर क्रमांक एम. एच. १७ सी . व्ही.१५०३ ताब्यात घेतला आहे.- वाहनाची अंदाजे किंमत: २५ लाख रुपये- जप्त केलेल्या ६ब्रास वाळूची अंदाजे किंमत: १८ हजार रुपये एकूण जप्त मुद्देमाल : २५ लाख १८ हजार रुपये या प्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस कॉन्स्टेबल विनोद कुदनर यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी तुषार कैलास खर्डे (रा. पाचमोऱ्या, कोल्हार भगवती, ता. राहाता) आणि रामदास जाधव (पूर्ण नाव व पत्ता पोलिसांच्या नोंदीनुसार आडगाव, ता. राहाता) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र पर्यावरण संरक्षण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ५०८/२०२६ नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो .हे.कॉ. वाल्मिक पारधी करीत आहेत.

# गंगापूर तालुक्यात वाळू उपशावरून वादाचा भडका | एकाचा डोक्यात वार करून खून

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील सनव येथील शिवना नदीपात्रात अवैध वाळू उपशावरून दोन गटांत झालेल्या वादाचे पर्यवसान थेट हाणामारीत होऊन एका इसमाचा मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना- बुधवार ७ ऑक्टोबर रोजी पहाटे २ ते ३ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत डोक्यात अज्ञात हत्याराने वार झाल्याने रियाज पठाण (रा. सनव) यांचा मृत्यू झाला असून अशद सत्तार शेख (रा. सनव) हा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेने सनव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. गंगापुर तालुक्यातील सनव येथील शिवना नदीपात्रात रात्री जेसीबीच्या साहाय्याने वाळू उपसा करून डंपरमध्ये भरण्याचे काम सुरू असताना रियाज पठाण व अशद सत्तार शेख हे नदीपात्रात आले होते. यावेळी दुसऱ्या गटातील काही जणांनी त्यांच्यावर हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे.



या हल्ल्यात रियाज यांच्या डोक्यात अज्ञात हत्याराने जोरदार वार झाल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी लासुर स्टेशन येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मृत्यू झाल्याचे घोषित केले अशद शेख यालाही मारहाण झाल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. हल्लेखोरांपैकीही एक जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. दरम्यान, चार ते पाच दिवसांपूर्वी रियाज यांचे वाळू वाहतुकीचे ट्रॅक्टर पोलिसांना पकडून दिले होते. तसेच रियाज यांनी रात्री पोलिसांना समोरील गटाच्या वाहनाबाबत माहिती दिल्याच्या कारणावरून दोन्ही गटांत वाद निर्माण झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. या दोन्ही गटांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू असल्याची माहिती असून, यापूर्वीही शिल्लेगाव पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल असल्याचे सांगण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी जान्हवी शेखर तसेच शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील व पोलिसांच्या पथकासह पहाटेपासून घटनास्थळी तळ ठोकून आहेत. घटनास्थळाची पाहणी करून पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध सुरू केला आहे. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी जान्हवी शेखर यांनी दिली. गंगापूर तालुक्यात ठीक ठीकाणी होत असलेले अवैध गौण खनिज उत्खनन बंद करण्यासाठी संबंधित विभाग अपयशी ठरत असल्याने अशा घटना घडत असल्याचे नागरिकांमधून बोलले जात आहे.

# मध्यमेश्वर बंधाऱ्याजवळ २५ ब्रास वाळू साठा जप्त

## महसूलकडून घरकुल लाभार्थींना मोफत वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : येथील मध्यमेश्वर बंधाऱ्याजवळ प्रवरा नदीपात्रात अनधिकृतरीत्या साठवून ठेवलेली सुमारे २५ ब्रास वाळू महसूल विभागाने धडक कारवाई करीत जप्त केली. पथकाने प्रवरा नदीपात्राची अचानक पाहणी केली असता तेथे निरनिराळ्या ठिकाणी लहान मोठे असे पाच वाळूचे ढीग आढळून आले. तहसीलदारांच्या समक्ष या वाळूसाठ्याचा रितसर पंचनामा करून तो ताब्यात घेण्यात आला. प्रशासनाने सामाजिक बांधिलकी जपत जप्त केलेली वाळू नेवासा खुर्द कार्यक्षेत्रातील घरकुल लाभार्थ्यांना मोफत देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार नेवासा नगरपंचायतचे घरकुल विभागाचे अभियंता राहुल आढाव यांच्याकडे ताबे पावती देऊन सदरची वाळू लाभार्थ्यांना सुपूर्त करण्यात आली. नगरपंचायतमार्फत बाळासाहेब निकम,अमोल विखे,अमीन अब्दुल शेख,दिनेश रामू लष्करे व सुनीता अनिल मोरे या घरकुल लाभार्थ्यांना ही वाळू वाटप करण्यात आली.दरम्यान, नदीपात्रातून अनधिकृत वाळू वाहतुकीसाठी वापरला जाणारा मुख्य रस्ता जेसीबीच्या सहाय्याने खड्डे खोदून कायमचा बंद करण्यात आला. या कारवाईत मंडळ अधिकारी अनिल गव्हाणे,ग्राममहसूल अधिकारी धनंजय परदेशी,पल्लवी पवार,नवनाथ लष्करे, राहुल चव्हाण व कृष्णा टेकावडे यांनी भाग घेतला.